## ठाण्यात पीएसएलवर सट्टा; दोघांना मुद्देमालासह अटक



**ठाणे :** पाकिस्तान सुपर लीगमधील क्रिकेट सामन्यांमध्ये सट्टा खेळणाऱ्या दोघांना ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने घोडबंदर येथून अटक केली. दीपक ठक्कर (५६) आणि जितेंद्र चंदे (४८) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे असून पोलिसांनी त्यांच्याकडून चार मोबाइलसह १८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. घोडबंदर येथील एका हॉटेलमध्ये काहीजण सट्टा खेळत असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या युनिटला मिळाली होती. त्याआधारे पोलिसांच्या पथकाने सापळा रचून दीपक आणि जितेंद्र या दोघांना ताब्यात घेतले. हे दोघेही पाकिस्तान सुपर लीग सामन्यांमध्ये सट्टा लावत असल्याचे चौकशीत समोर आले. या प्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना अटक करीत अधिक तपास सुरू केला आहे.


मंगळवार, १५ फेब्रुवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २०९

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


### अंतरंग


नवी मुंबई मनपा प्रभाग रचनेवर हरकती, सूचना/२

'नेमको'च्या कामगारांसाठी भाजप आक्रमक/५

क्रिकेट स्पर्धेत रायगडने हिंगोलीला नमविले/६


# काँग्रेसने देशाची माफी मागावी

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस गरजले

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह राज्यात एकीकडे काँग्रेस आंदोलन करीत असताना दुसरीकडे राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते तथा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी सोमवारी (दि. १४) भाजप नेत्यांची बैठक झाली. या वेळी फडणवीसांनी संवाद साधताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी माफी मागण्याचा प्रश्नच नाही. माफी मागायची असेल तर देशाचे वाट्टोळे केल्याबद्दल काँग्रेसने मागावी, असे म्हटले.

या बैठकीस देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत आमदार आशिष शेलार, आमदार प्रसाद लाड, कृपाशंकर सिंग, मंगलप्रसाद लोढा उपस्थित होते. फडणवीसांच्या सागर निवासस्थानाबाहेर काँग्रेस कार्यकर्ते आंदोलनासाठी पोहचले असताना भाजप कार्यकर्तेही त्यांच्या भेटीसाठी आले होते. या वेळी या कार्यकर्त्यांनी फडणवीसांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणा दिल्या.



फडणवीस म्हणाले की, कोणाची हिंमत नाही ते इथे येऊन निदर्शने करतील. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले नौटंकीबाज आहेत. यांनी कितीही नौटंकी केली तरी काही परिणाम होत नाही

दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आंदोलनासाठी निघाले असताना पोलिसांनी त्यांना अडविले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करीत असल्याचे पटोले जाहीर केले. त्यावर काँग्रेसने घाबरून हे आंदोलन मागे घेतल्याचे भाजपने म्हटले आहे.

### काँग्रेसच्या आंदोलनावर राष्ट्रवादीची नाराजी

काँग्रेसने विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर केलेल्या आंदोलनाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसने नाराजी व्यक्त केली आहे. कोणत्याही राजकीय पक्षाने नेत्याच्या घराबाहेर किंवा कार्यालयाबाहेर आंदोलन करू नये ही आमच्या पक्षाची भूमिका आहे. हा नवीन पायंडा म्हणजे कार्यकर्त्यांमध्ये हमरीतुमरी, हाणामारीसारखी परिस्थिती निर्माण करण्यासारखे असून योग्य नाही, असे राष्ट्रवादीचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी म्हटले आहे.

# शिवसेना खासदार राजेंद्र गावितांना एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा

## पावणेदोन कोटींची भरपाई करण्याचेही आदेश

**पालघर : प्रतिनिधी**

जमीन विकास कामी देण्यात आलेला चेक न वटल्याच्या कारणाने दाखल केलेल्या एका प्रकरणात पालघरच्या प्रथम वर्ग न्यायालयाने शिवसेना खासदार राजेंद्र गावीत यांना एक वर्षाचा तुरुंगवास व पावणे दोन कोटी रुपयांची भरपाई रक्कम भरण्याचे करण्याचे आदेश दिले आहेत.

पालघर शहरामध्ये साईनगरजवळ असलेल्या एका भूखंडाचा विकास करण्यासाठी एक कोटी रुपयांसाठी करारनामा शहरातील विकसक चिराग किर्ती बाफना यांच्यासोबत ८ ऑक्टोबर २०१४ रोजी झाला होता. या कराराचे उल्लंघन करीत खासदार राजेंद्र गावित यांनी हीच जागा अन्य विकसकाला विकसित करण्यासाठी दिली होती तसेच जिल्हाधिकारी यांना पत्र लिहून चिराग बाफना यांना विकासकामासाठी परवानगी देण्यास विरोध केला होता.

सन २०१७मध्ये पालघरच्या दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) येथे विकास कराराची पूर्तता न झाल्याबद्दल संबंधित विकसकांनी दावा दाखल केला होता. यास अर्जाबाबत सन २०१९मध्ये राजेंद्र गावित यांनी बचाव न करता पैसे घेतल्याचे व करारनामा वर सही केल्याची कबुली दिली होती. या प्रकरणात अडीच कोटी रुपये रक्कम देण्याची तडजोड न्यायालयासमोर झाली होती. या तडजोडीत उल्लेखित रकमेपैकी एक कोटी रुपयांचा चेक वटल्यानंतर २५ लाख रुपयांचे सहा चेक वटले नाहीत.

दीड कोटी रुपयांच्या थकित रक्कम न दिल्याप्रकरणी तसेच चेक न वटल्या प्रकरणात सन २०२० रोजी पालघरच्या



प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला असता सन २०२२मध्ये खासदार गावीत यांनी पावसाळी अधिवेशन, कोरोना संक्रमण व स्वतःच्या आरोग्याची कारणे पुढे करून आपले म्हणणे मांडण्यास विलंब झाल्याचे नमूद करून विलंबमाफीसाठी अर्ज केला होता तसेच आपण आदिवासी असल्याने आपल्यावर दबाव टाकून व दिशाभूल करून तडजोडनाम्यावर सही करून घेण्याचे त्यांनी न्यायालयापुढे मांडले होते. पालघरचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी विक्रांत खंडागळे ज्यांनी खासदार गावित यांची बाजू ग्राह्य न धरता त्यांना पावणेदोन कोटी रुपयांची भरपाई तसेच एक वर्षाची शिक्षा देण्याचे आदेश सोमवारी दिले. गेल्या अनेक वर्षांपासून विकास करारनामासंबंधित बाबी न्यायप्रविष्ट राहिल्याने या निर्णयाकडे पालघर जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते.

दरम्यान, या निकालानंतर खासदार गावित यांनी न्यायालयात केलेला जामीन अर्ज मंजूर करण्यात आला असून भरपाईची रक्कम भरण्यास किंवा निकालाविरुद्ध स्थगिती आदेश घेण्यास महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

### पेण येथील अल्पवयीन मुलीची हत्या आणि बलात्कार प्रकरण

## अलिबाग न्यायालयात खटल्याची सुनावणी सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण मळेघर आदिवासी वाडीतील पीडित तीन वर्षीय मुलीवर शारीरिक अत्याचार करून तिला जीवे मारण्याची घटना २०२०मध्ये घडली होती. याबाबतचा खटला अलिबागच्या जलदगती न्यायालयात सुरू झाला आहे. विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी या प्रकरणी सोमवारी (दि. १४) पाच साक्षीदारांची साक्ष तपासली, तर आरोपी पक्षाचे वकील अ‍ॅड. पोकळे यांनी युक्तिवाद केला. मंगळवारी उर्वरित साक्षीदारांची साक्ष तपासण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. भूषण साळवी यांनी दिली.

२९ डिसेंबर २०२० रोजी पेणमधील मळेघर आदिवासी वाडीवरील तीन वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. पोलिसांनी या घटनेचा तपास करून आरोपी आदेश पाटील याला अटक केली. आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. तो अलिबाग येथे शिक्षा भोगत होता. पॅरोलवर तो त्या कालावधीत बाहेर होता. घरी आल्यावर त्याने हे घृणास्पद कृत्य केले. पेण पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून अ‍ॅड उज्वल निकम यांची नियुक्ती शासनाने केली असून अलिबाग येथे विशेष पोक्सो न्यायाधीश शाहीदा शेख याच्या न्यायालायत सुनावणी सुरू आहे.



**पणजी : गोवा विधानसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी साखळी मतदारसंघातील कोथंबी येथे मतदानाचा हक्क बजावला.**

### निवडक

#### कोरेगाव भीमा हिंसाचारप्रकरणी चौघांचा जामीन फेटाळला

**मुंबई :** चार वर्षांपूर्वी पुण्यातील एल्गार परिषदेनंतर कोरेगाव भीमा येथे हिंसाचार झाला होता. या प्रकरणी अटकेत असलेले आरोपी सागर गोरखे, रमेश गायचोर, ज्योती जगताप आणि दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक हनीबाब या चौघांचा जामीन अर्ज मुंबई सत्र न्यायालयाने सोमवारी (दि. १४) फेटाळला.

#### रेल्वेत अन्नपदार्थांची सुविधा प्रवाशांसाठी पुन्हा झाली सुरू

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने सोमवार (दि. १४)पासून रेल्वेत शिजवलेले अन्नपदार्थ प्रवाशांना देण्याची सुविधा पुन्हा सुरू केली आहे. कोविड निर्बंधामुळे रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फक्त चहा, नाश्ता आणि लांब पल्ल्याच्या ट्रेन प्रवासासाठीच तयार जेवण मिळत होते. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्याने निर्बंध हटून रेल्वे प्रवाशांनाही दिलासा मिळाला आहे.

## मराठा आरक्षणासाठी संभाजीराजे २६ फेब्रुवारीपासून करणार उपोषण

**मुंबई : प्रतिनिधी**



मराठा आरक्षणासह समाजाच्या इतर मागण्यांसाठी उपोषण करण्याची घोषणा खासदार संभाजीराजे यांनी सोमवारी (दि. १४) मुंबई येथे पत्रकार परिषदेत केली. आपण २६ फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषण करणार असल्याचे त्यांनी या वेळी जाहीर केले.

संभाजीराजे म्हणाले की, आम्ही कुठल्याही पक्षाच्या विरोधात किंवा कोणताही राजकीय अजेंडा घेऊन आलेलो नाही. मराठा समाजाला न्याय मिळावा एवढीच आमची मागणी आहे. मराठा समाजावर अन्याय होत असल्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा वंशज म्हणून मी २००७पासून महाराष्ट्र पिंजून काढतोय. ज्या शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींचे नेतृत्व केले, ज्या शाहू महाराजांनी बहुजन समाजाला पहिले आरक्षण दिले, त्यामध्ये अनुसूचित जाती जमातीसह मराठा समाजाचा समावेश होता. त्याच समाजासाठी आज माझा लढा आहे.

मराठा समाजदेखील वंचित घटक आहे. त्यासाठीच आरक्षणाची भूमिका घेतली. मी मराठा असल्याने मराठा आरक्षणासाठी लढत नाही, तर इतक्या वेळा आंदोलन करूनही कोणतीच मागणी पूर्ण झालेली नाही. मी आतापर्यंत आक्रमक होतो, पण आता मी उद्विग्न झालो आहे. मला टोकाची भूमिका न घेण्यास सांगण्यात आले, पण राज्य सरकार काहीच हालचाल करीत नाही. त्यामुळे २६ फेब्रुवारीला मी स्वतः मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला बसणार आहे, असे संभाजेराजेंनी सांगितले.


# काँग्रेसच्या युवराजांमुळे माझे हेलिकॉप्टर रोखले होते

## ■ पंतप्रधान मोदींचा पंजाबमध्ये निशाणा

**जालंधर : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. १४) जालंधर येथील प्रचार सभेत पंजाबमधील २०१४मधील एका घटनेवरून काँग्रेस आणि राहुल गांधींवर हल्ला चढवला. काँग्रेसच्या युवराजांमुळे अमृतसरवरून उड्डाण करीत असताना माझे हेलिकॉप्टर पंजाबमध्ये रोखण्यात आले होते, असे पंतप्रधान मोदी यांनी या वेळी सांगितले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, हे लोक कसे आहेत? त्यांचे चारित्र्य कसे आहे? मी तुम्हाला सांगतो. २०१४च्या लोकसभा निवडणुका होत्या. मी गुजरातचा मुख्यमंत्री होतो आणि भाजपने मला पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून घोषित केले होते. निवडणूक प्रचारासाठी मी देशभर फिरत होतो. एक दिवस मला पठाणकोठला यावे लागले आणि इथून मला हेलिकॉप्टरने हिमाचल प्रदेशला जायचे होते. काँग्रेसचे युवराज, जे फक्त पक्षाचे खासदार होते बाकी काही नाही. त्या दिवशी त्यांचाही अमृतसरच्या आसपास काही कार्यक्रम होता. पठाणकोठला पोहचायला मला दीड तास उशीर झाला.



तेथे गेल्यावर माझ्या हेलिकॉप्टरला पुन्हा उड्डाण करू दिले नाही, कारण काँग्रेसच्या युवराजांना पंजाबच्या अन्य भागात जायचे होते. त्यामुळे मला हेलिकॉप्टरने प्रवास करण्यास मनाई करण्यात आली. मला हिमाचल प्रदेशातील दोन्ही कार्यक्रम रद्द करावे लागले. अशा प्रकारे सत्तेचा दुरुपयोग या लोकांनी केला.

काँग्रेसची सरकारे रिमोट कंट्रोलने चालवली जातात. आज काँग्रेसची अवस्था बघा. हा पक्ष तुटत चालला आहे. त्यात त्यांचेच नेते हे उघड करीत आहेत. ज्या पक्षात इतकी अंतर्गत भांडणे आहेत तो पक्ष पंजाबला स्थिर सरकार देऊ शकत नाही. रविवारी पंजाब नव्या सरकारसाठी मतदान करणार आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# पनवेल मनपा हद्दीतील कॅन्सरग्रस्त महिलांना मिळणार अर्थसहाय्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना व मुला-मुलींना अर्थसहाय्य मिळण्याचा ठराव सोमवारी (दि. १४) झालेल्या पनवेल महापालिकेच्या महिला बालकल्याण समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. हा विषय आता येणाऱ्या सर्वसाधारण महासभेत मांडण्यात येणार आहे.

महिला व बालकल्याण समितीची बैठक सभापती हर्षदा उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त दालनाशेजारील सभागृहात ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली. या बैठकीस सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सचिव तिलकराज खापर्डे आदी उपस्थित होते.



बदलती जीवनशैली व प्रदुषणामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. कॅन्सर आजाराच्या उपचाराकरिता होणारा खर्चही मोठा असतो. पनवेल महापालिका क्षेत्रातील अशा गरजू लोकांना रुग्णांच्या औषधोपचारासाठी मदत म्हणून अर्थसहाय्य दिल्यास त्यांना आर्थिक संकटातून बाहेर येण्यास मदत होईल या हेतूने हा विषय बैठकीत मांडण्यात आला. या विषयास सर्व सदस्यांनी मंजुरी दिली. यामुळे कॅन्सरग्रस्त महिला व मुला-मुलींना २५ हजार रुपयांची आर्थिक मदत होणार आहे. पुढील कार्यवाहीसाठी हा विषय महासभेत मांडण्यात येणार आहे.

याबरोबरच ८ मार्चला साजरा होणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या नियोजनाबद्दल या वेळी चर्चा करण्यात आली तसेच सभापतींनी दिलेल्या इतर विषयांच्या प्रस्तावावर, सदस्यांनी मांडलेल्या विषयांवरही चर्चा झाली.

## हिजाब न घातल्याने भारतात सर्वाधिक बलात्कार होतात

### काँग्रेस नेत्याचे वादग्रस्त विधान

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

कर्नाटकमध्ये सध्या महाविद्यालयात हिजाब घालण्यावरून मोठा वाद सुरू आहे. या प्रकरणावर देशभरातून प्रतिक्रिया उमटत आहेत. या वादातच आता काँग्रेस नेत्याने एक वादग्रस्त विधान केले आहे.



काँग्रेसचे नेते जमीर अहमद यांनी, भारतात सर्वाधिक बलात्काराच्या घटना नोंदल्या जातात, कारण महिला पर्दा करीत नाहीत किंवा चेहरा झाकत नाहीत, असे अकलेचे तारे तोडले आहेत.

एएनआय या वृत्तसंस्थेने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये अहमद यांनी म्हटलेय की, मुली मोठ्या झाल्यावर त्यांचे सौंदर्य लपवण्यासाठी त्यांना 'पर्दा' म्हणजेच बुरख्यामागे ठेवणे, त्यांचे सौंदर्य दिसू नये ही हिजाबची संकल्पना आहे. मला वाटते जगात सर्वाधिक बलात्काराच्या घटना भारतात होतात, कारण स्त्रिया 'पर्दा' करीत नाहीत.

# विषय भरकटवण्यासाठी संजय राऊतांकडून पत्रकार परिषदेचा घाट

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा हल्लाबोल; राज्य सरकारचाही समाचार

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना नेते खासदार संजय राऊत मंगळवारी शिवसेना भवनात पत्रकार परिषद घेणार आहेत. तेथे पक्षातील पदाधिकारी, आमदार, खासदार उपस्थित असतील. त्यापूर्वीच सोमवारी (दि. १४) भाजप नेते किरीट सोमय्या यांनी राऊत यांच्यावर हल्लाबोल केला. उद्या पत्रकार परिषद घेणार आहात, तर आजच्या प्रश्नांची उत्तरे का देत नाहीत, असा प्रश्न उपस्थित करीत विषय भरकटवण्यासाठी पत्रकार परिषदेचा घाट घातला जातोय, असा आरोप सोमय्या यांनी केला आहे.



किरीट सोमय्या म्हणाले की, कोविड सेंटरमध्ये झालेल्या कोटचवधी रुपयांच्या घोटाळ्यावर संजय राऊत आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अद्याप उत्तरे दिली नाहीत. कोरोना काळात सरकारने जनतेच्या जीवाशी खेळ केला आहे. कोविड कंपनीत घोटाळा करून लोकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांना जनता माफ करणार नाही. कोविड सेंटरमधील घोटाळ्याचा विषय भरकटवण्यासाठी पत्रकार परिषदेचा घाट घातला जातोय.

संजय राऊत यांच्या मुलीच्या लग्नाच्या पार्ट्या कोणत्या-कोणत्या हॉटेलमध्ये केल्या जातात याची माहिती त्यांनी द्यावी, असे आव्हान सोमय्या यांनी दिले. सोमय्या यांनी राऊत यांच्यासह राज्य सरकारवरही या वेळी आरोप केले. राज्य सरकारकडून फौजदारी कायद्यात घोटाळा करण्यात आला आहे, असे सोमय्या म्हणाले.

फौजदारी कायद्यात राज्य सरकारकडून घोटाळा करण्यात आलाय. मी गुन्हा केला असेल तर कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जाण्याची माझी तयारी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# यूपीत माफियागिरी अखेरच्या घटका मोजतेय!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल

**कानपूर : वृत्तसंस्था**



उत्तर प्रदेशमध्ये आधीच्या सरकारांनी येथील सामर्थ्याला न्याय दिला नाही. त्यांनी यूपी लुटली आणि इथल्या लोकांना गुन्हेगार-दंगलखोर-माफियांच्या स्वाधीन केले, परंतु आता योगी सरकारच्या काळात यूपीमध्ये माफियागिरी अखेरच्या घटका मोजत आहे, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींची सोमवारी (दि. १४) कानपूरमध्ये जाहीर सभा झाली. या वेळी बोलताना त्यांनी उत्तर प्रदेशात १० दिवस आधीच होळी साजरी केली जाईल. निवडणुकीचा निकाल १० मार्चला येणार आहेत. तेव्हाच रंगांची होळी धूमधडाक्यात सुरू होईल, असे सूचक विधान केले.


२०१७ पूर्वी यूपीमध्ये रोज रेशन घोटाळे होत होते. त्यांनी लाखो रुपयांची बनावट शिधापत्रिका बनवल्या. डबल इंजिन सरकारने ही बनावट शिधापत्रिका योजना बंद केली. आज उत्तर प्रदेशातील कोट्यवधी नागरिकांना मोफत रेशन मिळत आहे. माझ्या गरीब भगिनी आणि मातांची चूल कधीच बंद होणार नाही, असे पंतप्रधान म्हणाले.

### पंजाब सरकारवर निशाणा

**जालंधर :** पंजाबमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी रंगली असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोमवारी (दि. १४) जालंधर येथे पहिली प्रचारसभा झाली. या सभेत बोलताना त्यांनी राज्यातील सत्ताधारी काँग्रेस पक्षाला लक्ष्य केले व चरणजीतसिंग चन्नी यांच्या सरकारवर गंभीर स्वरूपाचा आरोप केला.

पंजाबमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेत त्रुटी राहिल्याने मोठी खळबळ उडाली होती. हुसैनीवाला येथे जात असताना निदर्शकांनी ताफा रोखल्याने पंतप्रधानांना सुरक्षेच्या कारणास्तव पुढील सर्व कार्यक्रम रद्द करून मागे फिरावे लागले होते. ५ जानेवारी रोजी फिरोजपूरमध्ये हा प्रकार घडला होता. त्यानंतर पंजाब विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने प्रथमच पंतप्रधान येथे आले आणि त्यांनी पहिला वार काँग्रेस आणि राज्य सरकारवर केला. 'ही सभा झाल्यानंतर त्रिपुरमालिनी देवीचे दर्शन घेण्याची माझी इच्छा होती, मात्र येथील प्रशासन आणि पोलिसांनी हात वर केले. रस्तेमार्गे जायचे झाल्यास आम्ही त्यासाठी व्यवस्था करू शकणार नाही. तुम्ही हेलिकॉप्टरने तिथे जावे, असे मला सांगण्यात आले. ही येथील सरकारची आजची अवस्था आहे', अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी चन्नी सरकारवर निशाणा साधला.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)




**पनवेल : येथील भाजपची सत्ता असलेल्या महापालिकेच्या वतीने सातत्याने विविध विकासकामे करण्यात येत असतात. त्यातून नागरिकांना विविध सेवा-सुविधा उपलब्ध होतात. अशाच प्रकारे शहरातील पटेल हॉस्पिटलजवळील रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले असून लवकरच नागरिकांना येथून मार्गक्रमण करणे आणखी सुलभ होणार आहे.**

# नवी मुंबई महापालिका प्रभाग रचनेवर हरकती व सूचना

## विशिष्ट पक्षांच्या सोयीसाठी प्रभाग रचना बनवल्याचा भाजपचा आरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोग, महापालिका अधिनियम, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना करताना सर्रास उल्लंघन झाल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभाग रचनेमध्ये विशिष्ट राजकीय पक्षांना फायदा पोचवण्यासाठी प्रभागांची मोडतोड करण्यात आली आहे. या विरोधात सोमवारी (दि. १४) शेवटच्या दिवशी भाजपच्या वतीने निवडणूक अधिकारी तथा महापालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे मोठ्या संख्येने हरकती आणि सूचना सादर करण्यात आल्या. जवळपास तीन हजारांपेक्षा जास्त हरकती सूचना पालिका मुख्यालयात आणि विविध प्रभाग कार्यालयांमध्ये दाखल करण्यात आले आहेत. हरकती आणि सूचना यांची मोठी संख्या पाहता सदोष प्रभाग रचना विरोधात नवी मुंबईत मोठ्या प्रमाणावर असंतोष असल्याचे दिसून येते आहे.

नवी मुंबई महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक एप्रिलमध्ये अपेक्षित आहे. महापालिका क्षेत्रात पूर्वीच्या १११ प्रभागात ११ची भर पडून एकूण १२२ प्रभाग झाले आहेत. पालिकेची निवडणूक पॅनल पद्धतीने होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार महापालिकेच्या निवडणूक विभागाने तयार नवीन प्रभाग रचना तयार करून ती १ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध केली. नवीन प्रभाग रचनेत नियमांचे सर्रास उल्लंघन झाल्याचा आरोप भाजपने केला आहे. महापालिकेच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून विशिष्ट राजकीय पक्षाने त्याला फायदेशीर ठरेल अशी प्रभाग रचना करून घेतली आहे. दिघा, ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे, वाशी, नेरूळ, बेलापूर व अन्य सर्व नोडमधील प्रभागांमध्ये सदोष प्रभाग रचना करण्यात आल्या आहेत. नवी मुंबई पालिकेच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेत एकाच प्रभागातील इमारती, वस्त्या दोन प्रभागांमध्ये विभागण्यात आल्या आहेत. सीमांकनासाठी मोठे रस्ते उपलब्ध असताना छोट्या गल्ल्यांचे आधारे सीमांकन करण्यात आले आहे. नाल्यांच्या सीमा ग्राह्य धरण्यात आलेल्या नाहीत.दिघा विभागात अनावश्यकरित्या लहान लोक्ससंख्येचे प्रभाग तयार करण्यात आले आहेत. नियमबाह्य पद्धतीने दलित वस्त्यांचे विभाजन करण्यात आले आहे. त्यामुळे मागासवर्गीयांना प्रतिनिधित्व मिळणार नाही. माजी महापौर सुधाकर सोनावणे यांचा प्रभाग क्रमांक ११ हा थेट महापेपर्यंत नेण्यात आला आहे. काही प्रभागांमध्ये अंतर दोन ते तीन किलोमीटरचे निर्माण झाल्याने मतदारांना मतदान करण्यात अडचणी येणार आहेत. भौगोलिकदृष्ट्या प्रभागांची रचना न करता ते सोयीस्कररित्या वाढवण्यात अथवा कमी करण्यात आले आहेत. यात गावेदेखील विभागली गेली आहेत, असे आरोप भाजपने केले आहेत.

प्रभाग रचनेचे निकष उल्लंघन करून वस्त्यांचे आणि विशेष करून मागासवर्गीय वस्त्यांचे बेकायदा विभाजन करण्यात आले आहे. याचा मोठा परिणाम मागासवर्गीय अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणात होणार आहे. ईलठणपाडा, विष्णूनगर वस्तीचे तीन भागात विभाजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर वस्तीचे दोन ते तीन भाग चिंचपाड्याला जोडण्यात आले आहेत. पूर्वी हा संपूर्ण भाग प्रभाग १९मध्ये होता. डॉ आंबेडकर नगर, भीम नगर, कातकरी पाडा, निबान टेकडी, गौतम नगर हे सर्व भाग भौगोलिकदृष्ट्या एकसंघ आहे. त्याचे दोन तुकडे केले असून एक भाग चिंचपाडा तर दुसरा भाग महापेला जोडला आहे. चिंचपाडासाठी ऐरोली, तर महापेसाठी कोपरखैरणे प्रभाग कार्यालय आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे, याकडे भाजपने लक्ष वेधले आहे.

### लोकसंख्येच्या निकषाचे उल्लंघन

*नवीन प्रारूप प्रभाग रचनेमध्ये लोकसंख्येच्या निकषांचे उल्लंघन करण्यात आले आहे. २०११च्या जनगणनेच्या आधारे प्रभाग रचना करण्यात आल्याचा आरोप भाजपने केला आहे. सव्वादोन लाख वस्तीमध्ये सदस्य संख्या वाढविण्यात आली आहे. कमी लोकसंख्येचे प्रभाग करण्यात आले आहेत, तर नऊ लाखांच्या वस्तीसाठी सहा सदस्य संख्या वाढविण्यात आली आहेत.*

### प्रभागांची मोडतोड

*महापालिका निवडणुकीमध्ये भाजपचे नुकसान करण्यासाठी विशिष्ट पक्षाच्या प्रभावाखाली आणि त्यांना निवडणुकीत लाभ मिळवून देण्यासाठी प्रभागांची रचना करण्यात आली आहे. अनेक प्रभागांमध्ये जाणूनबुजून बेकायदा बदल आणि सीमांकन करण्यात आले आहे. आमच्या मातब्बर नगरसेवकांचे प्रभाग तोडण्यात आल्याचा आरोप भाजपने केला आहे.*

### उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार

***सदोष प्रभाग रचनेविरोधात राज्यघटनेच्या कलम २२६ अन्वये उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्याची तरतूद उपलब्ध आहे. चुकीच्या आणि मनमानी पद्धतीने केलेली प्रभाग रचना जर दुरुस्त केली नाही तर या विरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशारा भारतीय जनता पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.***

# दापोलीतील परबांच्या रिसॉर्टवर कारवाईसाठी ठाकरे सरकारकडून टाळाटाळ -किरीट सोमय्या

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सोमवारी (दि. १४) पत्रकार परिषद घेत दोपोलीमधील साई रिसॉर्टवरून मंत्री व शिवसेना नेते अनिल परब आणि ठाकरे सरकारवर टीका केली. तसेच रिसॉर्ट बांधणाऱ्याविरोधात फौजदारी कारवाई करण्यासाठी राज्य सरकारकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

किरीट सोमय्या म्हणाले की, केंद्र सरकारने साई रिसॉर्ट पाडण्याचे आदेश दिले. ९० दिवसांत अगोदरसारखी जमीन करण्याचे निर्देश आहेत. त्याचबरोबर सीआरझेड कायद्यात जी तरतूद आहे ती म्हणजे ज्यांनी हे बांधले त्याच्याविरोधात फौजदारी कारवाई करण्याचे निर्देशदेखील केंद्र सरकारने पर्यावरण मंत्रालयाच्या विभागीय संचालकांना दिले आहेत. आज मी त्या संदर्भात जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. नोटीस त्यांना सुपूर्द झालेली आहे. गुन्हेगारी फौजदारी कारवाईसंबंधात महाराष्ट्र सरकार गोंधळ, गडबड, घोटाळा करीत आहे. या संदर्भात अनेकदा पुरावेदेखील सादर करण्यात आलेले आहेत.

दोन विषय एकत्र येत आहेत. एक म्हणजे तो रिसॉर्ट बेकायदेशीर आहे, हे जिल्हाधिकाऱ्यांपासून उपजिल्हाधिकारी, महसूल मंत्रालय, महाराष्ट्र सरकार हे सगळेच मान्य करतात. महसूल विभागाच्या म्हणण्यानुसार त्याचा जो एनए दिला गेला होता तो फसवणूक करून दिला गेला होता. दुसरी गोष्ट फसवणूक करून जो एनए दिला होता तिथे ५०० मीटरच्या बांधकामासाठी दिला होता, पण बांधकाम १७०० मीटरपेक्षा जास्त. ते ज्या अधिकाऱ्याने फसवणूक करून दिले त्याच्याविरोधात सरकारने कारवाई सुरू केली आहे. रिसॉर्ट पाडण्याचे आदेश महाराष्ट्र सरकारने दिले. कायद्यानुसार त्यात दोन्ही कृती एक म्हणजे रिसॉर्ट पाडण्याची कारवाई आणि दुसरे एमआरटीपीमध्ये ज्याने बांधला त्याच्यावर फौजदारी कारवाई, तर जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र विभाग महसूल विभागाने अजून फौजदारी कारवाईची प्रक्रिया अद्याप सुरूच केलेली नाही. एनएही रद्द झाला. त्या अधिकाऱ्यावर कारवाई सुरू झाली. मग फौजदारी कारवाई का नाही, असा सवाल सोमय्या यांनी केले.

एमआरटीपी, एनए, सीआरझेड या तिन्ही दृष्टीने तो रिसॉर्ट पाडण्याचे निर्देश दिले गेले आहेत. मग तो रिसॉर्ट का पाडला जात नाही. क्रमांक दोनचा मुद्दा म्हणजे फौजदारी कारवाई तर करायचीच आहे, हे सगळे मान्य करतात, पण कोणाविरुद्ध करायची? याबाबत महाराष्ट्र सरकार उडावाउडवी करत आहे. अनिल परबदेखील काय बोलत आहेत हे मला समजत नाही. कधी तरी म्हणतात माझा त्याच्याशी काय संबंध? कधीतरी सांगतात हे अनधिकृत आहे तर कारवाई करा. मग जर पालकमंत्री म्हणत आहेत की अनधिकृत आहेत तर कारवाई करा. ती पालकमंत्र्यांची जबाबदारी आहे की ज्यांनी बांधले त्यावर फौजदारी कारवाई झाली पाहिजे, असेही किरीट सोमय्या यांनी या वेळी सांगितले.

## एफ. जी. नाईक महाविद्यालयात शहिदांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळाचे कोपरखैरणे येथील एफ. जी. नाईक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १४) सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात २०१९मधील पुलवामा हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय स्वयंससेवकांनी अमर जवान स्मारकाची प्रतिकृती तयार करून सर्वांनी त्यास आदरांजली वाहिली. पथनाट्य सादर करून शहीद जवानांना अभिवादन करून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. मुलांमध्ये सैन्यभरतीबद्दल जनजागृती केली.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी शहिदांना श्रद्धांजली वाहून आपले विचार मांडले व सर्व विद्यार्थ्यांना भेदभाव त्यागून एकीने राष्ट्राचे हित जोपासण्यासाठी व भारत देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी आव्हान केले. सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी अनुष्का निकम व तनूजा देशमुख यांनी केले.

अभिवादन कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या उपस्थितांचे आभार कार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका जयश्री दहाट आणि प्राध्यापक संदेश सूर्यवंशी यांनी मानले.

## कोकण विभागीय लोकशाही दिनी दोन अर्ज निकाली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन सोमवारी (दि. १४) कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहेत.

या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या २४ असून आज आलेल्या अर्जांची संख्या २६ असे एकूण प्राप्त अर्ज ५० होते. त्यापैकी आज दोन अर्ज निकाली काढण्यात आले. आजपर्यंत रोजी ४८ तक्रारी प्रलंबित आहेत.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. क्रीडा संकुल, एचओसी, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर-६ कामोठे ■ १०. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. आंबेडकर भवन, पनवेल ■ १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली ■ १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- १७. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ व १८+)
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ व १८+)

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- वळवली रा.जि.प. शाळा
- पेंधर रा.जि.प. शाळा
- रोडपाली रा.जि.प. शाळा
- कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- मुर्बी रा.जि.प. शाळा


# डॉ. प्रीती महाजन यांची मुंबई विभागीय समन्वयक म्हणून नियुक्ती



**पनवेल :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करियर कट्टा या उपक्रमांतर्गत सन २०२२- २३ या शैक्षणिक वर्षासाठी मुंबई विभागासाठी विभागीय समन्वयक म्हणून कळंबोली येथील शिक्षणमहर्षि दादासाहेब लिमये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. प्रीती प्रसाद महाजन यांची नियुक्ती झाली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी केली असून याबद्दल महाजन यांचे अभिनंदन होत आहे.


महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

धारिका क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.०६/२०२२/जाहिरात | दिनांक: १४ फेब्रुवारी, २०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-

| जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | एकूण पदसंख्या |
| --- | --- | --- |
| ०११/२०२२ | पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ (अनुशेषाची पदे) | १२ पदे |
| ०१२/२०२२ | पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ | २१२ पदे |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरावयाच्या पदांचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, आरक्षण, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in व https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.

३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ ते दिनांक ७ मार्च, २०२२ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

४. आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

# पनवेल न्यायालय परिसरातील वाहतूक कोंडी फुटली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील न्यायालयाच्या परिसरात चारचाकी वाहनांना सोमवार ते शुक्रवार म्हणजेच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नो पार्कंगबाबत आणि दुचाकी वाहनांना सम-विषम पार्किंगबाबतची अधिसूचना पनवेल शहर वाहतूक विभागाच्या वतीने घोषित करण्यात आली होती. न्यायालयासमोरील परिसरात कार्यालयीन वेळेत चारचाकी वाहने पार्किंग केल्यास व दुचाकीस्वारांनी सम-विषम पद्धतीने वाहने पार्किंग न केल्यास कारवाईस सामोरे जावे लागेल, असे आवाहनही वाहतूक विभागाकडून करण्यात आले होते. त्यानुसार वाहतूक विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला.

पनवेलमधील वाहतूक कोंडीसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधिकारी, महापालिका अधिकारी, नगरसेवक आणि व्यापारी यांची वेळोवेळी बैठक होते. यामध्ये शहरातील रस्त्यांबाबत विभागवार प्रायोगिक तत्त्वावर उपाय राबविण्यात येत आहेत. त्यानुसार न्यायालय परिसरातील पार्किंगबाबत नवे नियम बनविण्यात आले. त्यामुळे येथील वाहतूक कोंडी फुटली असून, न्यायालय परिसराने मोकळा श्वास घेतला आहे.

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशानुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या माध्यमातून महापालिकेच्यावतीने याठिकाणी 'नो पार्किंग'चे फलकही लावण्यात आले आहेत. तरीदेखील न्यायालयात येणारे काही नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्किंग करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पनवेल शहर वाहतूक विभागाने अशा बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. तर काही वाहनचालकांनी प्रशासनाच्या या आवाहनाला प्रतिसाद देत न्यायालय परिसरात वाहने पार्किंग करणे बंद केले. त्यामुळे याठिकाणची वाहतूक कोंडी फुटली असून नागरिकही येथून विनाअडथळा ये-जा करीत आहेत.

पनवेल शहरातील न्यायालय परिसरात आजूबाजूला खाजगी हॉस्पिटल, पोलीस उपायुक्त कार्यालय, तालुका पोलीस ठाणे यासह इतरही महत्त्वाची शासकीय कार्यालये आहेत, तर न्यायालयाच्या समोरील बाजूस रहिवाशी सोसायट्यादेखील आहेत. याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे अडचणींचा सामना करावा लागत होता.



# लोकलच्या धडकेत दोन जणांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

लोकल गाडीची धडक लागून झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू झाला आहे. या अपघाती घटनांची नोंद पोलीस ठाण्यात झाली असून पोलीस मृतांच्या वारसांचा शोध घेत आहेत.

पहिल्या घटनेत कोपरखैरणे ते तुर्भे रेल्वेस्थानकांदरम्यान किमी नं. ४५/३० जवळ लोकल गाडीची धडक लागून एका ५५ वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाला. मृताची उंची पाच फूट सहा इंच, रंग निमगोरा, चेहरा उभट, नाक सरळ व अंगात निळसर रंगाचा त्यावर मारून रंगाचे पट्टे असलेला फुल शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट आहे.

दुसऱ्या घटनेत मानखुर्द ते वाशी रेल्वेस्थानकांदरम्यान किमी नं. २२/०६ जवळ लोकलची धडक लागून एका ५० वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृत्यू झाला. त्याची उंची पाच फूट तीन इंच, बांधा मध्यम, रंग काळा-सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, केस काळे, दाढी साधारण बारीक, मिशी तलवार कट असून अंगात हिरव्या-राखाडी-पांढऱ्या रंगाचे जर्किन, आत पिवळसर रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची ट्रक पॅन्ट आहे.

या दोन्ही मृतांच्या वारसांबाबत कोणाला माहिती असल्यास वाशी रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७८१२६९६) किंवा हवालदार श्रीकृष्ण वेदपाठक (९८७०१५७८५० व ७४९९५०९०५०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते गुरूनानक शिकवण स्तंभाचे अनावरण



**नवी मुंबई : बातमीदार**

शीख पंथाचे संस्थापक गुरू नानक यांची शिकवण प्रदर्शित करणाऱ्या स्तंभाचे अनावरण माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते नुकतेच झाले. गुरूनानक यांच्या ५५०व्या जयंती प्रकाश पर्वानिमित्त हा स्तंभ उभारण्यात आला आहे.

सायन-पनवेल महामार्गावरून वाशीत प्रवेश करताना हा स्तंभ दृष्टीपथास पडतो. वाशी गुरुद्वारा, दशमेश दरबार आणि सुप्रीम कौन्सिल नवी मुंबई यांच्या सहकार्याने तो निर्माण करण्यात आला आहे. वाशी गुरुद्वाराचे प्रमुख तेजंदर सिंग यांच्या संकल्पनेतून हा स्तंभ आकाराला आला असून आमदार गणेश नाईक यांच्या सहकार्यातून महामार्गालगत महाराष्ट्र आणि देशातील पाहिला गुरू नानक यांचा शिकवण स्तंभ साकारला गेला आहे.

या स्तंभाच्या निर्मितीमध्ये माजी महापौर सागर नाईक आणि माजी महापौर जयवंत सुतार यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे तेजंदर सिंग म्हणाले. १२ नोव्हेंबर २०१९मध्ये या स्तंभाचा शिलान्यास झाला होता, मात्र त्यानंतर उद्भवलेल्या कोरोना महामारीमुळे त्याचे काम रखडले होते. ते आता पूर्णत्वास गेले आहे.

या कार्यक्रमास माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेवक प्रकाश मोरे, संपत शेवाळे, माजी नगरसेविका नेत्रा शिर्के, सामाजिक कार्यकर्ते विजय वाळुंज, सुदत्त दिवे, सुप्रीम कौन्सिलचे जसपाल सिंग, कोपरखैरणे गुरूदवाराचे इंद्रजितसिंग भाटिया तसेच दिघ्यापासून कळंबोली, लोढापर्यंत असलेल्या ११ गुरूद्वारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### नवी मुंबईत स्मारक उभारणार

*या स्तंभाच्या उद्घाटन समारंभात बोलताना आमदार गणेश नाईक यांनी गुरू नानक यांचे मानवतावादी विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी नवी मुंबईत योग्य ठिकाणी त्यांच्या स्मारकाची उभारणी करण्याचे जाहीर केले. शीख पंथीयांच्या नवी मुंबईच्या विकासातील योगदानाचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.*

## मोहोपाड्यातील रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

# प्रवाशाचा किमती मोबाइल केला परत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

एका प्रवाशाचा रिक्षात सापडलेला मोबाइल रिक्षाचालकाने परत केला. याबद्दल या प्रामाणिक रिक्षाचालकाचे कौतुक होत आहे.

मोहोपाडा येथील स्वराज माळी हा लोधिवली अंबानी स्कूलचा विद्यार्थी असून तो लोधिवली ते मोहोपाडा असा रिक्षाने सोमवारी (दि. १४) दुपारच्या सुमारास प्रवास करीत होता. या वेळी त्याचा २५ हजार रुपये किमतीचा मोबाइल हरविला. हा मोबाइल विनोद शर्मा यांना रिक्षात सापडल्याने त्यांनी प्रामाणिकपणा दाखवून स्वराज माळी याचा शोध घेतला व मोहोपाडा रिक्षा चालक मालक संघटनेच्या थांब्याजवळ बोलवून मोबाइल सुपूर्द केला. संघटनेच्या वतीने शर्मा यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करून त्याचा सत्कार करण्यात आला.



# रसायनीतील वारकऱ्यांची देवगड येथे हरिनाम सेवा

**मोहोपाडा : राकेश खराडे**

रसायनी परिसरातील मोहोपाडा, शिवनगर, नवीन पोसरी, सावळे, देवळोली, आंबिवली येथील वारकरी संप्रदायातील सदस्य अहमदनगरमधील देवगड येथे अखंड हरिनाम सेवेत सहभागी झाले आहेत. तेथे चार दिवस ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन सावळे-रसायनीकरांच्या वतीने करण्यात आले आहे.

यामध्ये पहाटे काकड आरती, सकाळी ८ ते १२.३० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १२.३० ते २ भोजन, २ ते ५ पारायण, सायंकाळी ५ ते ६ प्रवचन, ६ ते ७ हरिपाठ, रात्री ७ ते ८.३० किर्तन नित्यनेम होत आहे. या भक्तिसेवेत रसायनी परिसरातील जवळपास शंभरपेक्षा जास्त वारकरी सहभागी झाले आहेत.





## रिस येथे गाडी पार्किंगवरून मारहाण; आरोपी अटकेत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रिस येथे ओटीभरण कार्यक्रमास बाहेरून स्वतःच्या गाड्या घेऊन पाहुणे आले होते. या वेळी शेजारी असलेल्या असवले बिल्डींगमधील इसमासोबत रविवारी (दि. १३) रात्री ८.१५च्या सुमारास गाडी पार्किंग करण्यावरून वाद झाला.

या वादात अभिषेक, कैलास व इतर ८ ते १० जणांनी प्रवीण पांडुरंग ठोंबरे व काका सुरेंद्र प्रभाकर चौधरी यांना दगड मारून दुखापत केली. इतर नातेवाईकांनादेखील लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. जखमी प्रवीण ठोंबरे यांच्यावर नवी मुंबईतील डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये, तर सुरेंद्र चौधरी यांच्यावर चांभार्ली येथील रेगे हास्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या प्रकरणी अभिषेक, कैलास व इतर आठ ते १० इसमांविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा झाला आहे.

# सही शुरुवात मोहिमेचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचा ब्रँड असलेल्या गोदरेज व्हेज ऑईलने त्यांच्या सही शुरुआत या मोहिमेंतर्गत एक नवीन व्हिडीओ सादर केला आहे. लोकांच्या आयुष्यात आनंद फुलविण्यासाठी अन्नपदार्थ किती मोलाची भूमिका बजावत असतात हे ठसविण्यासाठी या व्हिडीओमध्ये प्रसिद्ध मराठी नाट्य आणि चित्रपट अभिनेते भाऊ कदम आणि बॉलीवूड अभिनेत्री आणि शेफ तारा देशपांडे यांनी काम केले आहे.



या व्हिडीओमध्ये हे दोन कलाकार एकमेकांशी मजेने थट्टामस्करी करताना दिसणार आहेत. खाणं कसं चवीच्या पलीकडे नेणारं असतं आणि त्यातून एकत्वाची भावना कशी वाढीला लागू शकते यावर यात भर देण्यात आला आहे. आपल्यापैकी अनेक जण स्वयंपाकाकडे छंद, आकांक्षा किंवा आनंदासाठी मजेने करायचे काम म्हणून बघतो. असे असले तरी प्रत्येक क्षण आनंदात परिवर्तीत करून आपल्या आयुष्यात लोकांना एकत्र आणण्यात अन्न महत्त्वाची भूमिका बजावत असते. प्रत्येक खाद्यपदार्थ हा त्यातील घटक, चव, रंग-रूप याने वेगळा असला तरी स्वयंपाकाची प्रक्रिया बहुतांशवेळेला एकाच मुख्य घटकाने सुरू होते आणि तो घटक म्हणजे स्वयंपाकासाठी वापरले जाणारे खाद्यतेल. आनंद, मजा यांचा शिडकाव असणारे चांगले अन्न म्हणजे एक सुंदर अनुभव असतो. या व्हिडीओमध्ये लोकप्रिय महाराष्ट्रीयन पदार्थ शिरा बनविताना भाऊ कदम आणि तारा देशपांडे यांनी परस्परांबरोबर आत्यंतिक सौहार्द आणि एकत्वाचे दर्शन घडविले आहे. डिजिटल युगाचा प्रभाव लक्षात घेता हा व्हिडीओ विविध डिजिटल प्लॅटफॉर्म आणि गोदरेजच्या अनेक सोशल मिडिया हँड्ल्सवर आणि इतर प्लॅटफॉर्मवर दिसणार आहे. सही शुरुआत या स्पर्धेच्या माध्यमातून लोकांना त्यांच्या जोडीदाराशी जोडणाऱ्या खाद्यपदार्थाची माहिती देण्याविषयी विचारणा करण्यात येत असून डिजिटल प्लॅटफॉर्मवर ते दाखविले जातील.

गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे कार्यकारी संचालक आणि अध्यक्ष नितीन नाबर म्हणाले, आमच्या सही शुरुआत मोहिमेसाठी भाऊ कदम आणि तारा देशपांडे यांच्याशी जोडले जाताना आम्हांला खूप आनंद होत आहे. जसे हे दोन्ही कलाकार त्यांचा निखळ विनोद आणि सर्वोत्कृष्ट दर्जेदार आशय सादर करण्याबद्दल ओळखले जातात तसेच गोदरेज व्हेज ऑईलही चव, शुद्धता, गुणवत्ता यासाठी ओळखले जाते. या सहयोगात या काही छान समान गोष्टी आणि बंध आहेत जे आमच्या गोदरेज व्हेज ऑईलच्या गुणांना पुढे आणते.

या सहयोगाबद्दल बोलताना अभिनेते भाऊ कदम यांनी जाहिरात मोहिमेसाठी तारा आणि गोदरेजबरोबर काम करणे हा खूपच छान अनुभव आहे, असे सांगितले.

# 'सीकेटी'च्या एनसीसी विभागाची चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील राष्ट्रीय कॅडेट कोर (एनसीसी) विभाग सिनियर अंडर ऑफिसर मृण्मयी राजेंद्र धाडगे आणि अनुज धरमसिंह रणवा यांची दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचालनात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड करण्यात आली होती.

या वर्षी १७ राज्यांमधून महाराष्ट्र राज्याला सर्वश्रेष्ठ विजेता म्हणून प्रधानमंत्री ट्रॉफी हे प्रथम पारितोषिक देण्यात आले.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सध्या सुरू असलेला साथीचा आजार या परिस्थितीमध्ये सर्व सामाजिक अंतराचे नियम लादण्यात आलेले असताना स्वतःच्या तब्येतीची काळजी घेत ते या परिस्थितीतून पुढे आले.

सहा महिन्यांच्या अथक परिश्रमाचे सार्थक करून २६ जानेवारी रोजी झालेले राजपथवरील संचलन आणि २८ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पीएम रॅली पूर्ण करून दोन्ही कॅडेट ३० जानेवारी रोजी महाराष्ट्रात परतले.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. के. पाटील आणि एनसीसीचे कॅप्टन डॉ. यू. टी. भंडारे , सीटीओ नीलिमा तिदार यांनी त्यांचे कौतुक केले.




## संपादकीय


# नौटंकीचे राजकारण

भ्रष्टाचाराच्या नव्या आरोपांनी घायाळ झालेले महाविकास आघाडीचे नेते आक्रमक प्रत्युत्तराच्या नादात दिवसेंदिवस आणखी गाळात रुतत चालल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. संजय राऊत यांच्या धमक्या असोत किंवा नाना पटोले यांची नौटंकी या दोहोंचा भाजपवर परिणाम होण्याची सुतराम शक्यता नाही. उलटपक्षी महाविकास आघाडीची विश्वासार्हता मात्र दिवसेंदिवस धुळीला मिळत चालली आहे.

कोविड केंद्रातील भ्रष्टाचाराची प्रकरणे भारतीय जनता पक्षाचे नेते किरीट सोमय्या यांनी एकेक करून जाहीर करायला सुरूवात केल्यानंतर सत्ताधारी आघाडीतील नेत्यांचे धाबे दणाणले. त्याची परिणती पुणे महापालिकेच्या पायऱ्यांवर सोमय्यांना धक्काबुक्की करण्यात झाली. सोमय्या यांच्या धडाकेबाज राजकारणामुळे हादरलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी त्यांना नाही नाही ते शिव्याशाप दिले आणि सोमवारी तर शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी 'बहुत बरदाश्त किया, अब बरबाद करेंगे', अशी धमकी देण्यापर्यंत मजल गेली. अर्थात राऊत यांच्या धमक्या-दरडावण्यांना भाजपमध्ये कुणी मनावर घेत नाही आणि महाराष्ट्रातील जनतादेखील त्यांना गांभीर्याने घेत नाही. संजय राऊत यांच्या रोजच्या पत्रकार परिषदांमधून आमचे भरपूर मनोरंजन होते, असा टोला विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी गोमंतकाच्या दौऱ्यावर असताना मारला. तो चांगलाच वर्मी लागला आहे असे दिसते. 'भाजपचे साडेतीन नेते लवकरच तुरुंगाच्या कोठडीत असतील. जेथे माजी गृहमंत्री अनिल देशमुख अटकेत आहेत, त्याच कोठडीत त्यांची रवानगी होईल', अशा गमजासुद्धा राऊत यांनी मारल्या. भाजप नेत्यांच्या कथित भ्रष्टाचाराचे पुरावे राज्य सरकारकडे असतील तर त्यांनी खुशाल कारवाई करावी. सरकार त्यांचेच असल्यामुळे त्यांना कुणीही अडवलेले नाही, पण न्यायालयात अथवा पोलिसांकडे न जाता महाविकास आघाडीचे नेते पत्रकार परिषद कशासाठी घेत आहेत, असा प्रश्न पडतो. नेमका हाच प्रश्न सोमय्या यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला आहे. त्याचे उत्तर महाविकास आघाडीच्या नेत्यांना उघडपणे देता येत नसले तरी जनता त्यांची नौटंकी पुरेपूर ओळखून आहे. संजय राऊत यांच्याप्रमाणेच महाराष्ट्रातील जनतेच्या मनोरंजनाचा ठेका घेणारे दुसरे नेते म्हणजे प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले हे होय. पटोले यांना नौटंकीच्या राजकारणाची खोडच आहे. किंबहुना, त्याशिवाय त्यांना दुसरे काही जमतच नाही असा सूर आता काँग्रेस पक्षातच कुजबुजत्या आवाजात आळवला जात आहे. मोदी यांनी माफी मागावी तसेच भाजपच्या नेत्यांनीदेखील माफी मागावी, अशी हास्यास्पद मागणी करत नाना पटोले यांनी सोमवारी काँग्रेसचे आंदोलन छेडण्याची घोषणा केली होती. फडणवीस यांचे मलबार येथील सरकारी निवासस्थान असलेल्या बंगल्यासमोर काँग्रेसी आंदोलकांनी मोर्चा न्यावा, असे आवाहन पटोले यांनी केले होते, मात्र भाजपच्या कार्यकर्त्यांनी उग्र रूप दाखवताच सकाळी अकराच्या सुमारास आंदोलन गुंडाळून पटोले यांच्या अनुयायांना अक्षरश: मैदानातून पळ काढावा लागला. जनतेच्या दृष्टीने हा साराच विनोदी प्रकार होता. मुंबईत आंदोलन छेडण्यासाठी ताकद लागते. ती काँग्रेस पक्षाच्या मनगटात उरलेली नाही. तरीही विनाकारण नौटंकीचे राजकारण करून पटोले स्वत: तोंडघशी पडले आणि आपल्या पक्षालाही त्यांनी निराश केले. अशा प्रकारांमुळे तात्पुरती प्रसिद्धी मिळते, पण कार्यकर्त्यांचे मनोधैर्य कायमचे खचते हे साधे भान काँग्रेसच्या नेत्यांना उरलेले नाही. नौटंकीचे राजकारण मतदारांना आकृष्ट करू शकत नाही याचे भान सत्ताधाऱ्यांनी ठेवले तर ते त्यांच्याच हिताचे आहे.

# आरोग्य, सुख, आनंद, ऐश्वर्यासाठी ग्रामसमृद्धी

समाज प्रबोधक वामनराव पै यांच्या जीवनविद्या मिशनचे कार्य सर्वदूर आहे. जीवनविद्या मिशन ही सामाजिक व शैक्षणिक संस्था मागील ६५ वर्षापासून समाजातील सर्व स्तरातील कार्यघटकांवर काम करते. अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती, पर्यावरण जागृती, भेदभाव नष्ट करणे, स्त्री-सन्मान, शालेय विद्यार्थी व तरुण युवा यांच्याकरिता बाल व युवा संस्कार अभियाने, कार्यशाळा असे विविध प्रकारचे कार्य करून हे जग सुखी व्हावे व राष्ट्र पुढे जावे यासाठी कार्यरत आहे.






या कार्याबरोबर जीवनविद्या मिशन ही शासनासोबत ग्राहक संरक्षण, अवयव दान, विविध व्यसनांच्या दुष्परिणाबाबत जागृतीसह गावांचा सर्वांगिण विकास करणे व सर्वच बाबतीत दत्तक घेतलेली गावे आदर्श गाव बनविणे या उद्देशाने ग्रामसमृद्धी अभियान तसेच शेतकरी आत्महत्या थांबविणे आणि प्रबोधनाच्या माध्यमातून मानसिक सबलीकरण असे अनेकविध अभियाने संयुक्त विद्यमाने राबवित आहे. त्याचबरोबर विविध कार्पोरेट व सरकारी तसेच निमसरकारी कार्यालयांमध्येही अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी Enjoy Your Work, Stress Management या विषयाबाबतच्या कार्यशाळा आयोजित करून जीवनविद्या मिशन कार्य करीत आहे.

देशाचा केंद्रबिंदू असलेल्या खेड्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, यासाठी जीवनविद्या मिशनने ६० गावे दत्तक घेतली असून त्यापैकी २० गावांमध्ये जीवनविद्या मिशनने कार्य सुरु केले आहे. त्यातील ४-५ गावांमध्ये अतिशय परिणामकारक बदल दिसून आले. त्यामुळे ग्रामविकास विभागाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील अविकसित गावे दत्तक घेवून त्या गावाचा सर्वांगीण विकास करणे व ते गाव सर्वच बाबतीत आदर्श गाव बनविणे याकरिता ग्रामसमृद्धी अभियान राबविणेबाबतचा प्रस्ताव जीवनविद्या मिशनने शासनास सादर केला आणि जीवनविद्या मिशनने केलेल्या कामांची दखल घेत त्यास मान्यता दिली.

याअन्वये आता प्रत्येक गाव अधिकाधिक सुखी व समृद्ध करून गावातील भौतिक विकासासाठी सरकारी, निमसरकारी तसेच खाजगी संस्था, उद्योग समूहाचे आर्थिक सहकार्य मिळवून जीवनविद्या मिशनेचे प्रशिक्षित कार्यकर्ते हे कार्य करणार आहेत. हे कार्यकर्ते घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणार आणि त्याचा अभ्यास करून त्याचा अहवाल तयार करतील. या अहवालाचे नियोजन ग्रामपंचायतीसोबत सभा करून पुढील उद्दिष्टांवर भर देऊन कार्य करणार आहे. यात स्वच्छ घर, स्वच्छ परिसर, हागणदारी मुक्त गाव, प्लास्टिक बंदी, शून्य कचरा मोहीम, घनकचरा व्यवस्थापन, गाव व आजूबाजूच्या परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, स्त्री सन्मान, बेटी बचाव व बेटी पढाओ, महिला सक्षमीकरण, महिला बचत गट यांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण व सरकारी योजनांचे मार्गदर्शन, गावागावांत रोजगार वाढीस लागावा व गावाकडून शहराकडे नोकरी किंवा व्यवसाय करण्यासाठी येणारा लोंढा स्थानिक पातळीवरच आपले अर्थार्जन करू शकेल, या उद्देशाने स्थानिक पातळीवर स्वयंरोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणे. आवश्यक असल्यास त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देणे ही महत्त्वाची उद्दिष्ट्ये असणार आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांना संघटीत करून सेंद्रीय शेती करण्याचे प्रशिक्षण देणे व सेंद्रीय शेती, जोड धंदा, कुटीर उद्योग करण्यास प्रवृत्त करणे, सरकारी योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविणे व राबविणे, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रवृत्त करणे, ग्रामसमृद्धी अभियान अंतर्गत गावागावांमध्ये भौतिक विकास साधण्यासाठी सामाजिक दायित्व निधी (CSR) उपलब्ध करून देणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर परंतू मोजका वापर करण्यास शिकवणे, त्याचबरोबर संपूर्ण व्यसनमुक्त गाव, संपूर्ण अंधश्रध्दामुक्त गाव, प्रत्येक घर सुखी करणे, संस्कार युक्त गाव, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रहीत भावना वृद्धींगत करुन उत्कृष्ट नागरिक घडवणे, गावांतील भौतिक विकास कामांना सरकारी योजना व उद्योग समुहांच्या सहकार्याने गती देणे यावरही भर देण्यात येणार आहे.

शासनाशी समन्वय ठेवण्याचे कामही जीवनविद्या मिशन करणार असून प्रत्येक गावांमध्ये चालत असलेल्या सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी, शैक्षणिक संस्थामध्ये आठवड्यातून एक तास प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन पद्धतीने मानवी जीवनमूल्यांचे संस्कारयुक्त प्रशिक्षण शिबिर घेण्यात येणार आहेत. तसेच ग्रामस्थ, व्यावसायिक, विद्यार्थी, पालक यांची मानसिकता बदलण्यासाठी जीवनविद्या तत्वज्ञानाचे मूल्यात्मक संस्कार, शिक्षण ज्ञान, विविध विषयांवरील कार्यशाळा सर्व स्तरांपर्यत पोहचविण्यासाठी मदत करणार आहे.

जीवनविद्या मिशनला ही कामे सहजरित्या करता यावीत म्हणून या संस्थेची सहयोगी मार्गदर्शक संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली असून यापुढे ग्रामसमृद्धी अभियान राबविल्याने ग्रामस्थांच्या विचारसरणीत नक्कीच परिणामकारक बदल होऊन गावातील प्रत्येकाचा मानसिक, आध्यात्मिक, आर्थिक आणि शारिरीक स्तर उंचावणार आहे. जीवन विद्या मिशन या संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ग्रामसमृद्धी अभियानासाठी सरकारी योजनेतून खर्च करता येणार नाही. हा खर्च जीवन विद्या मिशन किंवा लोकवर्गणीमधून करण्यात येईल, असेही ग्रामविकास विभागाने शासन निर्णयाद्वारे जाहीर केले आहे.

ग्रामसमृद्धी अभियानाचे कार्य पद्धतशीरपणे यशस्वी होण्यासाठी आणि सर्व उद्दिष्ट्ये साध्य करून प्रत्येक गावात शाश्वत विकास साधण्यासाठी जीवनविद्या मिशन या संस्थेला ग्रामीण भागात कार्य करण्यासाठी सहकार्य करू या !

**-संजय डी. ओरके,**
सहायक संचालक (माहिती)

# पर्यायी व्यवस्था करून बससेवा सुरु करावी

## मुरूड शहर संघर्ष समितीचे आगार व्यवस्थापकांना निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

आपल्या आगारातील कर्मचारी हजर होत नसतील तर मुरूड आगार व्यवस्थापकांनी एसटीच्या विभागीय कार्यालयाकडे पर्यायी चालक, वाहकांची मागणी करून प्रवाशी सेवा पुर्ववत सुरु करावी, अशी मागणी मुरूड शहर संघर्ष समिती तर्फे करण्यात आली आहे.


(छाया : संजय करडे)

एसटी कर्मचारी संपावर गेल्याने मुरुड आगाराची प्रवासी वाहतूक सेवा गेल्या तीन महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे नागरिक, विद्यार्थ्यांचा खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर मुरूड शहर संघर्ष समितीने येथील एसटी आगार व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले. संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रकाश विरकुड, उदय चौलकर, अभिजीत सुभेदार, जाहीद फकजी, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सूर्वे, कुणाल सतविडकर, अरविंद गायकर, शिवसेना शहर अध्यक्ष अशिलकुमार ठाकूर, राजेंद्र मानकर, सुधीर पाटील, सुनिल विरकुड, प्रभाकर मसाल आदी यावेळी उपस्थित होते.

पेण व रोहा या आगारातून नियमीत गाड्या सुटत आहेत. मात्र मुरूड आगरातून फक्त पनवेलसाठी एकमेव गाडी सुटते, त्यामुळे मुरूडमधील प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्यामुळे एसटीच्या विभागीय कार्यालयाकडून किंवा इतर आगारातून (पेण, रोहा, पनवेल) वाहक, चालकांची मदत घेऊन मुरूड आगाराची वाहतूक व्यवस्था त्वरीत चालू करावी, असे या निवेदनात म्हटले आहे.

# माणगावात पोलिसांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

वाहतुकीचे नियम पाळणे गरजेचे आहे, त्यांचे उल्लंघन केल्यास आता मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. अशी कारवाई आपल्यावर होणार नाही, याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे, असे प्रतिपादन वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस फौजदार अनिल महाडिक यांनी येथे केले.

रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत येथील वाहतूक पोलीस युनिटमार्फत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये शनिवारी (दि. १२) विद्यार्थ्यांना वाहतूक नियम व दंडाबाबत सहाय्यक पोलीस फौजदार अनिल महाडिक यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते. वाहतुकीचे नियम सर्वांनी काटेकोरपणे पाळल्यास अपघातांचे प्रमाण घटून आपण सुरक्षितरित्या जीवन जगू शकतो, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.


(छाया : सलीम शेख)

हेल्मेटचा वापर करावा, दुचाकीवर ट्रिपल सीट जाऊ नये, वाहन चालविताना मोबाईलवर बोलू नये, वाहन चालविण्याचा परवाना नेहमी सोबत ठेवावा, वाहतुकीचे नियम प्रत्येकाने समजावून घ्यावेत, रस्ता ओलांडताना दोन्ही बाजूला पहावे, रस्त्याचा मार्ग बदलताना शक्यतो हात बाहेर काढणे अथवा इंडिकेटर देणे आदी नियम सर्व विद्यार्थी व वाहन चालकांनी पाळणे गरजेचे असल्याचे सहाय्यक पोलीस फौजदार महाडिक यांनी सांगितले.

माणगाव ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य तानाजी ढमाळ, महिला वाहतूक पोलीस विमल ठाकूर यांच्यासह विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आरोग्य प्रहर

# चिरतरुण दिसण्यासाठी या डाएटचा समावेश जरूर करा

वय जसेजसे वाढत जाते तसे त्याचा परिणाम आपल्या चेहऱ्यावर व आपल्या शरीरावरदेखील दिसून येत असतो. वाढत्या वयासोबत शारीरिक मर्यादाही येतात, परंतु आपण योग्य आहार ठेवल्यास वाढत्या वयातही आपण चिरतरुण दिसू शकतो. वयाच्या चाळीशीतही चिरतरुण दिसण्यासाठी या डाएटचा समावेश जरूर करा...

साधारणत: वयाच्या चाळीशीनंतर शरीराची अधिक काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत असतो. चाळीशीनंतर महिलांसोबत पुरुषांच्या शरीरामध्येही अनेक बदल घडत असतात. वाढत्या वयासोबत आपल्या आहारात बदल करणेही खूप गरजेचे असते.

**डाएट बदला :** कामाच्या ताणातून पुरुषांची नेहमी नकारात्मक मानसिकता असते. कामाचा व्याप तसेच इतर तणाव असल्याने त्याचा परिणाम त्याच्या शरीरावर जाणवत असतो. याचमुळे त्यांचे वैवाहिक जीवनदेखील अगदी निरस बनत असते. त्यामुळे अनेकदा त्यांना यावर महागडे उपचारदेखील करावे लागत असतात. परंतु यातून वाचण्यासाठी अनेकदा घरगुती उपचारदेखील प्रभावी ठरत असतात. तसेच आहारातही काही खास पदार्थांचा समावेश केल्याने शरीरावर चांगले परिणाम होतात.

**मखाना :** मखाना याला कमळाचे बीदेखील म्हणतात. ही एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे, त्यात प्रथिने, खनिजे, कार्बोहायड्रेट, फॉस्फरससारखी पोषक तत्त्वे असतात. पुरुषांनी रोज मखाना खाल्ल्यास शरीरात 'टेस्टोस्टेरॉन हार्मोन'चा स्राव वाढतो, ज्यामुळे शरीरातील कमजोरी दूर होते.

**खजूर :** सुक्या खजुरामध्ये फायबर, झिंक, मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि लोह मोठ्या प्रमाणात असते. आपल्या शरीराला थकवा जाणवत असल्यास खजूर खाल्ल्याने यातून चांगली ऊर्जा मिळत असते. खजूर खाल्ल्याने पचनक्रियाही चांगली होते, दुधात खजूर टाकून खाल्ल्याने हे शरीरासाठी फायदेशीर ठरत असते.

**दूध :** वयाच्या ४०व्या वर्षीही पुरुषांनी दररोज दूध पिणे आवश्यक असते, दूध हे पूर्णअन्न असल्याने त्यात अनेक प्रकारचे पोषक घटक असतात. हे स्टॅमिना वाढवण्यास मदत करते यातून शरीराला भरपूर ऊर्जा मिळते.

**असा करा आहारात समावेश**

मखाना आणि खजूर दोन ते तीन तास पाण्यात भिजत ठेवा. त्यानंतर एक ग्लास दूध घेऊन त्यात मखाना आणि खजूर बारीक करा. दुधात हे मिश्रण चांगले ढवळून घ्यावे. मखाना, खजूर टाकून तयार केलेले दूध रोज पिल्याणे यातून शरीरावर चमत्कारी परिणाम दिसून येतात. यासोबतच दूध आणि मध एकत्र प्यायल्यानेही शरीरातील कमकुवतपणा निघून जातो.

# स्वच्छ सर्वेक्षणासाठी माथेरान नगर परिषदेकडून तयारीला वेग






**कर्जत : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ साठी माथेरान नगर परिषदेने आतापासूनच कंबर कसली आहे. अधिकारी स्वतः प्रत्येक विभागात जाऊन स्वच्छतेविषयी पाहणी करीत आहेत. मागील वर्षी क्रमांक न आल्याने येणाऱ्या सर्वेक्षणात चांगली कामगिरी करून माथेरानचे नाव उंचावण्याचे आव्हान नगर परिषदेच्या प्रशासनावर आहे. त्यासाठी जुन्या झाडांचा सर्व्हे, रंगरंगोटी, जागोजागी स्वच्छता याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

माथेरानला लाखो पर्यटक येतात. पर्यटक फिरताना रिकाम्या प्लास्टिक बाटल्या फेकतात. त्यासाठी नगर परिषदेने प्रत्येक पॉइंटवर कचराकुंड्या उभारल्या आहेत. एखाद्या पर्यटकाने तेथे कचरा टाकला तर कर्मचाऱ्यामार्फत ते उचलायची व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही वाहनाला परवानगी नसल्याने मनुष्यबळावर कचरा संकलित केला जातो. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना स्वच्छता करण्यासाठी वेळा निश्चित केल्या आहेत.खाण्याचे प्लास्टिक रॅपर क्रश करून त्याचीसुद्धा विक्री करून उत्पन्न मिळवले जात आहे. बायोगॅसमध्ये हॉटेलचे शिळे अन्न टाकून त्यापासून पथदिवे उजळले जात आहेत. नगर परिषद हद्दीतील अनेक जुन्या झाडांची माहितीदेखील संकलित केली जात आहे. या सर्व कामांवर स्वतः मुख्याधिकारी देखरेख करत आहेत. स्वच्छता अधिकाऱ्याकडून दररोज प्रत्येक विभागातील स्वच्छतेचा आढावा घेतला जात आहेत. खराब झालेल्या भिंती स्वच्छ करून त्यावर चित्र रेखाटून त्या बोलक्या केल्या जात आहेत.

# माणगावात तीन वाहनांमध्ये अपघात, दोन जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव रेल्वे स्टेशनजवळ कुलस्वामिनी प्लाझासमोर तीन वाहनांमध्ये धडक झाली. या अपघातात दोघेजण जखमी झाले असून दुचाकी व रिक्षा या दोन वाहनांचे मोठे नुकसान झाले.

फिर्यादी शैलेश बबन ढाकवळ (वय ३५, रा. तिलोरे, ता. माणगाव) हे त्यांच्या ताब्यातील रिक्षा (एमएच-०६,बीव्ही-००५०) स्वतः चालवीत माणगाव बाजूकडून तिलोरे येथे जात होते. ते माणगाव रेल्वे स्टेशनजवळ कुलस्वामिनी प्लाझासमोर आले असताना एका भरधाव ट्रकने इंदापूर बाजूकडून माणगाव बाजूकडे जाणाऱ्या दुचाकीला (एमएच ०१-बीजे ४१४८) पाठीमागून ठोकर दिली. त्यानंतर ट्रक व दुचाकी ही दोन्ही वाहने रिक्षावर आदळली. या अपघातात दुचाकीस्वार संजय विजयराम केवत (रा. माणगाव) व रिक्षाचालक शैलेश ढाकवळ हे दोघे जखमी होऊन यांच्या वाहनाचे नुकसान झाले. दरम्यान, अपघातानंतर ट्रकचालक पळून गेला.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास महिला पोलीस नाईक के. डी. जाधव या करीत आहेत.

# ‘नेमको’ कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजप आक्रमक

## व्यवस्थापनाला दिले आमदार प्रशांत ठाकूर यांचे निवेदनपत्र

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील होराळे ग्रामपंचायत हद्दीतील नेमको कंपनीतील स्थानिक कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी खालापूर भाजप आक्रमक झाली असून भुमिपुत्रावर अन्याय करू नका तसेच नोकरीत भुमिपुत्रांना प्राधान्य द्या अशा आशयाचे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे मागणीपत्र खालापूर भाजपने सोमवारी (दि. १४) निमको कंपनी व्यवस्थापनाला दिले. या पत्राची कंपनी व्यवस्थापनाने दखल न घेतल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही भाजपच्या वतीने देण्यात आला आहे.

नेमको कारखान्यात सुमार १५४ कामगार काम करतात. कंपनी व्यवस्थापन अन्याय करीत असल्याने स्थानिक कामगारांनी आपल्या व्यथा भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यासमोर मांडल्या होत्या. खालापूर भाजपच्या प्रतिनिधींनी सोमवारी नेमको व्यवस्थापनाशी चर्चा करीत आमदार प्रशांत ठाकूर यांचे मागणीपत्र दिले. या वेळी स्थानिक कामगारांचे वेतन व बाहेरील कामगारांचे वेतन यातील तफावत, पगाराची स्लिप व बोनस न देणे तसेच इतर विविध मागण्यांची पूर्तता करण्यात यावी आदी विषयांवर भाजप प्रतिनिधींनी कंपनी व्यवस्थापनाबरोबर चर्चा केली. या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, कोषाध्यक्ष सनी यादव, अंकुश मोरे, श्रीकांत भोईर, महेश कडू, नागेश पाटील, परेश खोपकर आदी उपस्थित होते.



**भाजप शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या व निवेदनाबाबत वरिष्ठांशी व कारखाना मालकांशी चर्चा करून त्याची सर्व माहिती भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना देण्यात येईल.**
**–महेश पांडे, व्यवस्थापक, नेमको कंपनी, होराळे, ता. खालापूर**

**नोकरीत स्थानिकांना ८० टक्के प्राधान्य द्यावे तसेच स्थानिक व बाहेरील नोकरदार याच्यातील पगार आणि बोनसमध्ये असलेली तफावत दूर करून सर्वांना समान पगार, बोनस द्यावा.**
**–विठ्ठल मोरे, जिल्हा उपाध्यक्ष, रायगड भाजप**

**आमदार प्रशांत ठाकूर यांचे निवेदनपत्र तसेच चर्चेतून नेमको कंपनीतील स्थानिक कामगारांच्या समस्या व्यवस्थापनासमोर मांडल्या आहेत. या समस्या लवकरात लवकर सोडवल्या नाही तर आंदोलन छेडण्यात येईल.**
**–सनी यादव, कोषाध्यक्ष, रायगड जिल्हा भाजप**

# ‘रुग्णोपयोगी साहित्य केंद्र रुग्णांसाठी आधार बनेल’

## नेरळ येथे केंद्राचे उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीने नेरळमध्ये नव्याने सुरू केलेले रुग्णोपयोगी साहित्य केंद्र हे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आधार केंद्र बनेल, असा विश्वास नेरळमधील सुप्रसिद्ध डॉ. अश्विनी कर्वे यांनी व्यक्त केला.



(छाया : विनायक माडये)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती गेली ४९ वर्षे महाराष्ट्रामध्ये गरीब, गरजूंसाठी, वनवासी वाड्यांवर तसेच आपत्तीमध्ये अविरत सेवेचे कार्य करीत आहे. या समितीने नेरळमध्ये रुग्णोपयोगी साहित्य केंद्र सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन रविवारी (दि. १३) करण्यात आले. त्यावेळी कै. बापूराव धारप सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमात डॉ. कर्वे बोलत होत्या.

समितीचे जिल्हा कोषाध्यक्ष संजीव दातार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. जनकल्याण समितीचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून कुलाबा जिल्ह्यामध्ये नवीन ५० सेवा प्रकल्प सुरू करणार असल्याची माहिती समितीचे कुलाबा जिल्हा कार्यवाह नितीन भावे यांनी प्रास्ताविकात दिली. रुग्णोपयोगी साहित्य केंद्र हे रुग्णाबरोबरच त्यांच्या कुटुंबियांशी जोडणारा दुवा ठरेल अशी आशा त्यांनी या वेळी व्यक्त केली.

महाराष्ट्र प्रांतामध्ये सात आयामांमध्ये सुरू असलेल्या जनकल्याण समितीच्या १५८० हून अधिक सेवा कार्यांची माहिती विस्ताराने माहिती समितीचे कोकण संभाग सहकार्यवाह आनंद राऊळ यांनी दिली. संघाचे कर्जत तालुका कार्यवाह संतोष देशमुख यांचेही यावेळी समयोचित भाषण झाले.

ऋचा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. समितीचे तालुका सहकार्यवाह श्रीहरी काळे, डॉ. अशोक कर्वे, विहिंपचे प्रखंड मंत्री ओंकार जोशी,आनंद काळे, महेश निगोजकर, बंडू काळे, केतन शिंदे, प्रयुश पारेख, अक्षय जोशी यांच्यासह नेरळमधील नागरिक कार्यक्रमाला उपस्थित होते. ओंकार भडसावळे यांनी आभार मानले. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

या रुग्णोपयोगी साहित्य केंद्रामध्ये प्रमोद भडसावळे आणि रमेश कुलकर्णी सेवा देणार आहेत.

# कर्जत नगर परिषदेच्या विषय समित्यांवर महायुतीचे वर्चस्व

**कर्जत : प्रतिनिधी**

सत्तारूढ शिवसेना, भाजप, आरपीआय महायुतीने कर्जत नगर परिषदेच्या विविध विषय समित्यांच्या सोमवारी (दि. १४) झालेल्या निवडणुकांमध्ये वर्चस्व सिद्ध केले आहे. चारही विषय समित्यांवर महायुतीचे सभापती बिनविरोध विराजमान झाले आहेत.

कर्जत नगर परिषदेच्या सभागृहात सोमवारी विषय समित्यांच्या निवडीसाठी पीठासीन अधिकारी तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना निवडणूक कामकाजकामी अधिकारी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सहकार्य केले.

कर्जत नगर परिषदेमध्ये १८ नगरसेवक आहेत, त्यापैकी १० नगरसेवक शिवसेना, भाजपा, आरपीआय महायुतीकडे आहेत तर आठ नगरसेवक राष्ट्रवादी, मनसे, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी, शिवराय भिमराय क्रांती संघटना या महाआघाडीचे आहेत.

**स्वच्छता, वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती**
**सभापती :** अशोक ओसवाल, **सदस्य** बळवंत घुमरे, विवेक दांडेकर, शरद लाड, ज्योती मेंगाळ.

**पाणीपुरवठा व जलनि:सारण समिती सभापती**–प्राची डेरवणकर, **सदस्य**–विवेक दांडेकर, वैशाली मोरे, पुष्पा दगडे, मधुरा चंदन(पाटील).

**सार्वजनिक बांधकाम, नियोजन विकास समिती**
**सभापती**–राहुल डाळींबकर, **सदस्य**–नितिन सावंत, संचिता पाटील, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे.

**महिला व बालकल्याण समिती**
**सभापती**–विशाखा जिनगरे, **उपसभापती**–संचिता पाटील **सदस्य**– स्वामिनी मांजरे, सुवर्णा निलधे, भारती पालकर.

**स्थायी समिती**
**सभापती** –नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, **सदस्य** –अशोक ओसवाल, प्राची डेरवणकर, राहुल डाळींबकर, विशाखा जिनगरे.


**पेण नगरपरिषद, पेण**
**निविदा सूचना**
सन २०२१–२२

पेण नगरपरिषद, पेण जि. रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक विद्युत ठेकेदार यांजकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | पेण नगरपरिषद हद्दीतील चिंचपाडा येथील जगदंबा सोसायटी समोरील व ट्री हाऊस स्कूलकडे जाणारी पथदिव्यांची निकामी केबल बदलणे. (फेर निविदा) | १,७९,०७३/– | १,०००/– | २००/– |
| २ | पेण नगरपरिषद कार्यालयातील 3KVA ऑनलाईन UPS करीता बॅटरी खरेदी करणे व कार्यान्वित करून देणे. | १,१६,५८३/– | १,०००/– | २००/– |

**कामाबाबत अटी व शर्ती :**
१. **निविदा विक्रीचा कालावधी :** १५/०२/२०२२ ते २२/०२/२०२२ पर्यंत पेण नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत.
२. सदरच्या सीलबंद निविदा कार्यालयीन वेळेत दिनांक २३/०२/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजे पर्यंत सादर करता येतील.
३. सदर कामाबाबत विस्तृत माहिती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवसाखेरीज नगरपरिषद कार्यालयात विद्युत विभागात मिळेल.

दि. १४/०२/२०२२
जा.क्र. पेनपा/विद्युत/२९४७

**सही/–**
**मुख्याधिकारी**
पेण, नगरपरिषद


# प्राथमिक शिक्षक पतपेढीचा कारभार संगणकावर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढीचा कारभार यापुढे संगणकावर चालणार आहे. सर्व शाखा आता संगणकीकृत झाल्या आहेत. पुढील काही दिवसात पतपेढीत आरटीजीएस व एनइएफटी अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील अशी घोषणा पतसंसथेचे अध्यक्ष राजेश सुर्वे यांनी दिली.



पतपेढीच्या अलिबाग, महाड, माणगाव व मंडणगड या शाखेच्या सभासदांचा मेळावा नुकताच महाड येथे पार पडला. यावेळी अध्यक्ष सुर्वे यांनी पतसंस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला.

पतसंस्थेत आता ऑनलाइन सुविधा दिल्या जाणार आहेत. कारभार पेपरलेस करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आरटीजीएस किंवा एनइएफटीसारख्या सुविधांमुळे सभासदांचा वेळ पैसा यांची बचत होईल शिवाय जिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना याचा लाभ मिळणार आहे. पतसंस्थेने यंदा ९७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सभासदांना २५ लाख रूपयांपर्यंत कर्ज दिले जाते. सभासद मयत झाल्यास त्याच्या वारसांना १० लाखांची मदत केली जाते. दुर्धर आजारासाठी १५ हजार रूपये विनापरतावा दिले जातात, असे सुर्वे यांनी सांगितले.

पॅनल प्रमुख नरेंद्र गुरव यांनी मनोगत सांगितले की, संस्था चांगल्या पद्धतीने कारभार करत असून संस्थेने आजपर्यंत ६५ लाख रुपयांचा मृत्यूफंड वितरीत केला आहे. तसेच संस्थेच्या नफ्याचा आलेख वाढत आहे. मेळाव्याच्या सुरुवातीला भारतरत्न लता मंगेशकर, अभिनेत रमेश देव व ज्ञात–अज्ञात मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संस्थेच्या ठेवीदार माया कुचेकर, बळीराम साळवी, तसेच महाड व माणगाव तालुक्यातील शिक्षकांना विपषनेचे प्रशिक्षण दिल्याबद्दल मनिषा लावरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी सभासदांना संगणकीकृत पासबुकचे वितरण करण्यात आले. पूजा शहा, दिनेश गावंड, मनीषा लावरे, माया कुचेकर, किसनदेव यमगर, प्रशांत तुळसुळकर, स्मिता नवघरे, श्याम आवळे, प्रदीप शिंदे, सुधीर मांडवकर, बळीराम साळवी आदींनी मनोगत व्यक्त केले.

मेळाव्याला महाड, पोलादपूर, मंडणगड तालुक्यातील सभासद शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. १. श्री.विरमाराम जवाराराम माली, २. श्री. माधव एस. देसाई, ३. श्री. जवानाराम देसाई रा. ४०२, श्रीकृष्ण विवान, घर नंबर ४११, खुटकबांधन, पो.खारघर, ता.पनवेल यांनी मौजे निताळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. हरि पदु वलपकर** रा.वावंजे, ता. पनवेल यांचे कडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मौजे – निताळे, तालुका – पनवेल, जिल्हा रायगड येथील मिळकत.**

| भूमापन क्र./ | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ७८ | ५ | जिरायत ०–३०–७०<br>पोटखराबा ०–०३–३० | |
| | | एकूण क्षेत्र ०–३४–०० | |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, गहाण, दान बक्षिस, साठेकरार, इजमेंट, वहिवाट, वचनपात्र, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, वारसाहक्क हुकूमनामा करारमदार, फरोक्त, अखत्यार, समजोता, तत्सम दावे, इ. अन्य तिऱ्हाई इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या कायम खरेदी कराराचे व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या कायम खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/०२/२०२२

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**

पत्ता : १३३७ बी रूम नं २ शिवाजी पाटील निवास प्रभु आळी. जुना पनवेल जि.रायगड ४१० २०६ . फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११



**नमुना एन. डी.**
**(नियम ९२ (अ) पहा)**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/CC/Auto/2018/3381 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46-AZ-7233 चे मालक **प्रल्हाद दामाजी पाटील** यांचे दिनांक १४/०५/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी, **रेश्मा प्रल्हाद पाटील, पत्ता– मोरावे गाव, मरी आई मंदिराजवळ, पोस्ट–वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव : रेश्मा प्रल्हाद पाटील,**
**पत्ता–** मोरावे गाव, मरी आई मंदिराजवळ, पोस्ट–वहाळ,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मोबाईल : ९८१९११६७३१


# खोपोली शिळफाटा येथील टोळक्याचा धुडगूस

## हाणामारी आणि दुचाकीचे नुकसान

**खोपोली : प्रतिनिधी**

क्रिकेट सामन्याच्यावेळी झालेल्या वादातून शिळफाटा येथील मस्जिद मोहल्ला संघातील सदस्यांनी धुडगूस घालत तीन तरुणांना जबर मारहाण करीत दुचाकीची तोडफोड केल्याची घटना खोपोलीत घडली आहे.

खोपोलीतील दाता अपार्टमेंटच्या समोरील मैदानावर शिवबा ग्रुपच्या वतीने क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. सामन्यादरम्यान मस्जिद मोहल्ला संघातील खेळाडूने अतिश शिंदे या तरुणाची बॅट खेळण्यासाठी घेतली व ती परत देताना शिवीगाळी केली. यावेळी झालेल्या बाचाबाची नंतर अनिस शेख, शरीफ शेख, पापा सिद्दी नूर शेख यांनी दहा जणांचे टोळके बोलावून पुन्हा धुडगूस घालत तन्मय चाळके व रोहन देशमुख यांना हाताबुक्क्याने, बॅटने व स्टॅम्पने मारहाण केली. तसेच अजिंक्य पाटील याच्या नाकावर ठोसा मारला. रोहन देशमुख याच्या दुचाकीची तोडफोड करून नुकसान केले.

या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक एस. कदम करीत आहेत.


**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. यशवंत देवराम मोरे, रा. वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्तु कृष्णा मुकादम यांचे कडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मौजे – वावंजे, तालुका – पनवेल, जिल्हा रायगड येथील मिळकत.**

| भूमापन क्र./ | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ११ | २ | जिरायत ०–४१–००<br>पोटखराबा ०–०४–०० | ९.३५ |
| | | एकूण क्षेत्र ०–४५–००<br>पैकी ०–०५–०० गुंठे | |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, गहाण, दान बक्षिस, साठेकरार, इजमेंट, वहिवाट, वचनपात्र, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, वारसाहक्क हुकूमनामा करारमदार, फरोक्त, अखत्यार, समजोता, तत्सम दावे, इ. अन्य तिऱ्हाई इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या कायम खरेदी कराराचे व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या कायम खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/०२/२०२२

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**

पत्ता : १३३७ बी रूम नं २ शिवाजी पाटील निवास प्रभु आळी. जुना पनवेल जि.रायगड ४१० २०६ . फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११



**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस/जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, माझे अशिल वसीम इकबाल शेख रा. प्लॉट नं. ३, मनियार सोसायटी, नेंशनल उर्दू हायस्कूलच्या बाजूला, धुळे, महाराष्ट्र-४२४००१ खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि **१) करुणा राजाराम झाबरे, २) नारायण महादेव पाटील, ३) सुनंदा अंबाजी पाटील, ४) संदिप अंबाजी पाटील, ५) लता जयवंत शेळके, ६) गिता संतोष म्हात्रे, ७) संध्या हेमंत पाटील, ८) रामचंद्र वामन पाटील, ९) गिरधर वामन पाटील, १०) परशुराम वामन पाटील ११) अशोक वामन पाटील, १२) हरीश्चंद्र वामन पाटील, १३) देविदास वामन पाटील, १४) नटेश्वर गोमाजी भोपी, १५) धावजी गोमाजी भोपी, १६) इंदिरा गोमाजी भोपी, १७) परमानंद गोमाजी भोपी, १८) दुर्गेश रामजी पाटील, १९) हेमलता थॉमस शिंगारे** यांची सामाईक यांचेकडून मौजे जुई, ता. उरण, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. ९९, हिस्सा क्र. १४, क्षेत्र ०.५२.१० हे.आर.चौ.मी. पोटखराबा ०.०७.६० आकारणी ४.२५ ह्या मिळकत खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदरहू खाली वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्यास नक्की केले आहे. तरी सदर मिळकतीवर ज्या कोणाचा वारस, कब्जा, बक्षीसपत्र, गहाण, दान, लोन, केस व अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती योग्य त्या कागदपत्रासह निम्न स्वाक्षरीसह यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत नोंदवाव्यात. सदर मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट दि. १०.०१.२०२२ रोजी ॲड. सागर गायकवाड यांनी दिलेले आहे त्या सदर मिळकत बोजारहित निर्वेध निजोखमी असल्याचे दिसून येते. हि मिळकत खरेदी करण्यास कोणतीही हरकत नाही.

वरील मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजे विरहित आहे असे समजून व ज्यांचा हक्क असेल तो त्यांनी सोडून दिला आहे असे गृहित धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व तो सर्वांवर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

सदरहू मिळकत मौजे जुई, ता. उरण, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. ९९, हिस्सा क्र. १४, क्षेत्र ०.५२.१० हे.आर.चौ.मी. पोटखराबा ०.०७.६० आकारणी ४.२५ येथे आहे. सदरहू मिळकतीचे एकून क्षेत्रफळ ०.५२.१० चौ.मी. पैकी पोटखराबा ०.०७.६० आहे.

पत्ता:- प्लॉट नं. ३, मनियार सोसायटी, नेंशनल उर्दू हायस्कूलच्या बाजूला, धुळे, महाराष्ट्र-४२४००१
मो. नं. ८३५६९५३५०६
दिनांक: १५/०२/२०२२

**सही/-**
**(ए.के.दुबे)**
**एडवोकेट हाईकोर्ट मुंबई**
जनारदन पाटिल हाउस, जी.बी. रोड, कासरवाडवली, ठाणे, वेस्ट
मो.: ९९६९३८६४०६.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल**
पिनकोड–४१०२०६
E-mail- panvel.ee@32mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०

**ई–कार्यप्रणाली अंतर्गत ई–निविदा क्र. ७८**
**(ई–निविदा) सन २०२१–२२**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील खात्याकडील योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप –** या निविदेमध्ये एकूण ०८ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १५.०२.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक ०१.०३.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई–निविदा जा. क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड

दिनांक :
विमाका/कोवि/२०२१–२०२२/३०४

**सही/–**
कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, पनवेल

### १४ वर्षांखालील मुलांची क्रिकेट स्पर्धा

# रायगडने हिंगोलीला नमविले

**अलिबाग : प्रतिनिधी**

नाशिक येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षाखालील मुलांच्या आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेत रायगड संघाने आपल्या गटातील पहिल्या सामन्यात हिंगोलीविरुद्ध विजय मिळवून सामन्याचे पूर्ण गुण वसूल केले. नाशिकविरुद्धचा दुसरा सामना अनिर्णित राहिला.



हिंगोलीविरुद्धचा सामना महात्मा नगर क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात हिंगोलीने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात ९७ धावा केल्या. रायगडच्या अमेय पाटील याने १२ षटकांत १७ धावा देऊन पाच बळी घेतले. त्याला साईराज जोशीने आठ षटकांत २२ धावांमध्ये दोन बळी व कर्णधार ओम म्हात्रेने चार षटकांत २६ धावांमध्ये तीन बळी घेऊन मोलाची साथ दिली.

रायगड संघाने आपल्या पहिल्या डावात २१४ धावा केल्या. आघाडीचे फलंदाज विनोद भोईर ७७ चेंडूंत ४० धावा व क्रिश बहिरा ८३ चेंडूंत ६१ धावा यांनी २४.१ षटकांमध्ये १०० धावांची भागीदारी करून चांगली सुरुवात करून दिली. हिंगोली संघ दुसऱ्या डावात १२९ धावांत गारद झाला. या डावातदेखील रायगडच्या अमेय पाटीलने पुन्हा १४.१ षटकांत ३३ धावांमध्ये पाच बळी घेतले व संपूर्ण सामन्यात १० बळी घेण्याची किमया केली. त्याला दुसऱ्या बाजूने ३१ धावांत तीन बळी घेऊन साईराज जोशीने चांगली साथ दिली. रायगड संघाने आपल्या दुसऱ्या डावात ५.२ षटकांमध्ये १३ धावा करून विजय मिळवला.

रायगडाचा गटातील दुसरा सामना नाशिकविरुद्ध झाला. या महत्त्वपूर्ण सामन्यात रायगडने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. द्रुतगती गोलंदाजांनी पहिल्या ५.१ षटकांमध्ये दोन बळी मिळवत कप्तानाचा हा निर्णय सार्थ ठरवला, परंतु नंतर नाशिकच्या फलंदाजांनी शंभर धावांची भागीदारी करून डाव सावरला. त्यानंतर मात्र ठरावीक अंतराने रायगडच्या गोलंदाजांनी बळी मिळवत नाशिकचा पहिला डाव २२८ धावांमध्ये संपवला. रायगडच्या शौर्य गायकवाडने १७ षटकांमध्ये ४४ धावा देऊन सर्वाधिक पाच बळी घेतले व त्याला अमेय पाटील व साईराज जोशी यांनी प्रत्येकी दोन बळी घेत सुंदर साथ दिली.

फलंदाजी करताना रायगडच्या पार्थ पवार २० धावा व क्रिश बहिरा ७९ यांनी ५७ धावांची भागीदारी नोंदवत चांगली सुरुवात करून दिली. तिसऱ्या विकेटकरिता ३३ धावांची भागीदारी करताना क्रिशने २८ चेंडूंत २६ धावा केल्या. पाचव्या विकेटकरता पुन्हा क्रिश व कप्तान ओम म्हात्रे यांनी ३०.१ षटकांमध्ये ६८ धावांची भागीदारी नोंदवली. सहाव्या विकेटकरिता म्हात्रे व निलेय सावंत यांनी ७.२ षटकांमध्ये २२ धावांची भागीदारी केली. तेव्हा रायगडचा धावफलक ७८.५ षटकांत ६ बाद १९१ असा होता. पुढे ठरावीक अंतराने रायगडचे फलंदाज बाद होत गेल्याने रायगड संघाचा धावफलक नऊ बाद २१२ असा झाला. त्यानंतर शेवटच्या गड्यासाठी स्मित पाटील नाबाद ११ धावा व साईराज जोशी नाबाद ७ धावा यांनी अखेरपर्यंत किल्ला लढवत उर्वरित ५.१ षटकांमध्ये १६ धावा केल्या. शेवटच्या चेंडूवर चार धावा हव्या असताना दोघांनी तीन धावा पळून काढल्या. त्यामुळे संघाचा धावफलक ९ बाद २२८ असा झाला व सामना बरोबरीत सुटला.

## ऑस्ट्रेलियाचा श्रीलंकेवर 'सुपर' विजय

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

सुपर ओव्हपर्यंत लांबलेल्या दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट लढतीत ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेवर सरशी साधून पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. निर्धारित सामन्यात २२ धावांत तीन बळी मिळवण्यासह सुपर ओव्हरमध्ये अवघ्या पाच धावा देणारा जोश हेझलवूड ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

प्रथम फलंदाजी करताना जोश इंग्लिशच्या (४८) फटकेबाजीमुळे ऑस्ट्रेलियाने ६ बाद १६४ धावा केल्या. प्रत्युत्तरात पथुम निसंकाच्या (७३) अर्धशतकामुळे श्रीलंकेने २० षटकांत ८ बाद १६४ धावांपर्यंत मजल मारली. मात्र निर्णायक सुपर ओव्हरमध्ये निसंका-दसुन शनका यांना अवघ्या पाच धावाच करता आल्या. मग ग्लेन मॅक्सवेल-मार्कस स्टोयनिसने तीन चेंडूतच विजयी लक्ष्य गाठले. उभय संघांतील तिसरा सामना मंगळवारी खेळवण्यात येईल.

## मांडवखारमध्ये शुटिंगबॉल स्पर्धा



**खारेपाट : रामप्रहर वृत्त**

मांडवखार येथे स्व. श्रीकांत मोकल यांच्या स्मरणार्थ आयोजित ६२व्या राज्यस्तरीय शुटिंगबॉल स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक अमित नाईक यांच्या हस्ते झाले, तर भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी उपस्थित राहून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

या वेळी तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, चिंचवलीचे माजी सरपंच राजाराम गावंड, समारंभ अध्यक्ष पांडुरंग म्हात्रे, किर्ती शाह, मुंबई शुटिंग बॉल असोसिएशनचे अध्यक्ष दीपक सावंत, विद्युत क्रिडा मंडळ अध्यक्ष शंकर मोकल, ज्येष्ठ खेळाडू प्रल्हाद मोकल, सामाजिक कार्यकर्ते संतोष अंबाडे, अनंत पाटील आदी उपस्थित होते. राष्ट्रीय खेळाडू रत्नेश मोकल व अन्य खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

---

**प्रीमियर लीग फुटबॉल**

### एम्बापेच्या निर्णायक गोलमुळे

## सेंट-जर्मेनचा विजय



**लंडन : वृत्तसंस्था**

किलियान एम्बापेने भरपाई वेळेत (९० ३ मि.) केलेल्या एकमेव गोलमुळे पॅरिस सेंट-जर्मेनने लीग-१ चषक फुटबॉल स्पर्धेत रेन्स संघावर १-० अशी मात केली. या विजयासह सेंट-जर्मेनने (२४ सामन्यांत ५९ गुण) अग्रस्थानावरील आघाडी भक्कम केली.

दरम्यान, प्रीमियर लीगमध्ये ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या मँचेस्टर युनायटेडला साऊदम्पटनने १-१ असे बरोबरीत रोखले. मँचेस्टरसाठी जेडन सँचोने २१व्या मिनिटाला गोल केला, मात्र ॲडम्सने ४८व्या मिनिटाला नोंदवलेल्या गोलमुळे साऊदम्पटनने बरोबरी साधली. २४ सामन्यांत ४० गुण कमावणारा युनायटेडचा संघ सध्या गुणतालिकेत पाचव्या स्थानी असून अग्रस्थानावरील मँचेस्टर सिटीपेक्षा (६३) ते तब्बल २३ गुणांनी पिछाडीवर आहेत.

### हिवाळी ऑलिम्पिक

## आरिफ खान ४५व्या स्थानी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचा हिवाळी ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेतील एकमेव स्पर्धक आरिफ खानला जायंट स्लॅलॉम स्कि प्रकारात ४५व्या स्थानावर समाधान मानावे लागले.

जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्याच्या ३१ वर्षीय आरिफने यानिक्कग नॅशनल अल्पिने स्किंग सेंटरवर झालेल्या स्पर्धेतील दोन शर्यतींमध्ये एकत्रित २ मिनिटे ४७.२४ मिनिटे वेळ नोंदवली. हिवाळी ऑलिम्पिक पदार्पण करणाऱ्या आरिफने पहिली शर्यत १:२२.३५ या वेळेत, तर दुसरी शर्यत १:२४.८९ या वेळेत पूर्ण केली. खराब वातावरणामुळे ही स्पर्धा चार तास उशिराने सुरू झाली. स्वित्झर्लंडचा सुवर्णपदक विजेता मार्को ओडेरमॅटने २:०९.३५ अशी वेळ नोंदवली. मार्को आणि आरिफ यांच्यात ३७.८९ सेकंद असा वेळेचा फरक होता.

## फ्रान्सकडून भारताला पराभवाचा धक्का

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या भारतीय पुरुष संघाला प्रो लीग हॉकीमध्ये पराभव पत्करावा लागला. शनिवारी रात्री झालेल्या लढतीत फ्रान्सने भारताला ५-२ अशी धूळ चारून त्यांचे विजयी हॅट्ट्रिक लगावण्याचे मनसुबे उधळून लावले.

जागतिक क्रमवारीत भारतीय संघ पाचव्या, तर फ्रान्स १२व्या स्थानी आहे. त्याशिवाय गेल्या आठवडय़ात झालेल्या पहिल्या टप्प्याच्या सामन्यात मनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने फ्रान्सला नमवले होते. त्यामुळे भारताचे पारडे दुसऱ्या लढतीसाठीही जड मानले जात होते.

फ्रान्ससाठी व्हिक्टर चार्लेटने (१६ आणि ५९वे मिनिट) दोन गोल केले. स्टॅनली लॉकवूड (३५ मि.), चार्ल्स मॅसोन (४८ मि.) आणि टिम क्लायमेंट (६० मि.) यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला. भारताकडून जर्मनप्रीत सिंग आणि हरमनप्रीत सिंग यांनी अनुक्रमे २२ आणि ५७व्या मिनिटाला गोल केले. परंतु उर्वरित तीन गोल नोंदवण्यात भारतीय संघ अपयशी ठरला. या पराभवानंतरही भारत गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी कायम असून त्यांच्या खात्यात तीन सामन्यांतील दोन विजयांचे सहा गुण जमा आहेत.

---

## अर्जुन तेंडुलकरने मानले संघमालक आणि सपोर्ट स्टाफचे आभार

### सर्वोत्तम देण्यासाठी तयार



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरची आयपीएल लिलावादरम्यान मुंबई इंडियन्सच्या संघात निवड झाली आहे. अर्जुनला मुंबई इंडियन्सने ३० लाखांमध्ये विकत घेतले. यानंतर अर्जुनने संघमालक आणि सपोर्ट स्टाफचे आभार मानले आहेत.

मुंबई इंडियन्सने अर्जुन तेंडुलकरला लिलावात गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त रक्कम देऊन विकत घेतले. लिलाव प्रक्रियेच्या शेवटी अर्जुनचे नाव यादीत आले. यानंतर मुंबई इंडियन्सने त्याच्या बेस प्राईससाठी २० लाख रुपयांची बोली लावली. मुंबईने बोली लावल्यानंतर, गुजरात टायटन्सनेही स्वारस्य दाखवत बोली लावली. यानंतर मुंबईने पुन्हा बोली लावली आणि या वेळी गुजरातने अर्जुनला मुंबई इंडियन्सकडे जाऊ दिले. अशा प्रकारे सलग दुसऱ्या वर्षी अर्जुनचा मुंबई इंडियन्सने समावेश केला.

या संदर्भात मुंबई इंडियन्सच्या सोशल मीडिया पेजवर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये अर्जुन म्हणाला, मुंबई इंडियन्स संघात पुनरागमन करताना मला खूप आनंद झाला आहे. मी लहानपणापासून या संघाचा मोठा चाहता आहे. माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल मी संघमालक आणि सपोर्ट स्टाफचे आभार मानू इच्छितो. मी संघात दाखल होण्यासाठी आणि माझे सर्वोत्तम देण्यासाठी तयार आहे.

## दुनिया हिला देंगे..!

### महालिलावानंतर मुंबईचा संघ परिपूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या महालिलावादरम्यान मुंबई इंडियन्सने आपला संघ तयार करण्यासाठी हुशारीने खेळी केली. लिलावाच्या दोन्ही दिवशी काही मोठी नावे मुंबईत दाखल झाली.

पहिल्याच दिवशी मुंबईने इशान किशनला १५.२५ कोटींमध्ये खरेदी करून मोठा धमाका केला होता. दुसऱ्या दिवशी मुंबई इंडियन्सचे लक्ष जोफ्रा आर्चरवर होते. मुंबईने इतर संघांसह बोली युद्ध जिंकले आणि आर्चरला आठ कोटी रुपयांना विकत घेतले. राजस्थान रॉयल्ससह इतर संघांनीही आर्चरसाठी बोली लावली होती, पण मुंबईकडे त्यांच्या पर्समध्ये भरपूर पैसे होते आणि त्यांनी ते वापरले. आर्चरशिवाय मुंबईने टीम डेव्हिडचाही आपल्या संघात समावेश केला आहे. त्याला मुंबईने ८.२५ कोटी रुपयांना विकत घेतले.

पहिल्या दिवसाच्या लिलावात मुंबई इंडियन्सची फळी शांत दिसत होती, पण दुसऱ्या दिवशी काही खेळाडू त्यांच्या निशाण्यावर होते. वेगवान गोलंदाज जयदेव उनाडकटला मुंबईने विकत घेतले. या वेळीही सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरला मुंबई इंडियन्सने संघात घेतले. गेल्या वर्षीही अर्जुन मुंबई संघात होता. त्याच्यासोबत मुंबईने टायमल मिल्सचाही समावेश केला. अशा प्रकारे संघमालकांना बोलीमध्ये लक्ष्यित केलेली नावे खरेदी करण्यात त्यांना यश आले.

**संघ** : रोहित शर्मा, कायरन पोलार्ड, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, अनमोलप्रीत सिंग, अर्शद खान, राहुल बुद्धी, रमणदीप सिंग, टिळक वर्मा, बेसिल थम्पी, जयदेव उनाडकट, जोफ्रा आर्चर, मुरुगन अश्विन, रिले मेरेडिथ, टायमल मिल्स, अर्जुन तेंडुलकर, मयंक मार्कंडे, डॅनियल सॅम्स, डेवॉल्ड ब्रेविस, हृतिक शोकिन, संजय यादव, टीम डेव्हिड, इशान किशन, फॅबियन एलन, आर्यन जुयाल.

## 'सीएसके'चा रैनाला अनोखा निरोप

**चेन्नई** : आयपीएलच्या दिग्गज खेळाडूंपैकी एक असलेल्या सुरेश रैनाला लिलावादरम्यान एकही खरेदीदार मिळाला नाही. लिलावात तो विकला न गेल्याने चेन्नई सुपर किंग्जने (सीएसके) त्याच्यासाठी एक पोस्ट शेअर केली आहे.

आयपीएल लिलावात सुरेश रैनाची मूळ किंमत दोन कोटी रुपये होती, मात्र कोणत्याही फ्रेंचायझीने त्याला खरेदी करण्यात रस दाखवला नाही. त्याचा जुना संघ चेन्नई सुपर किंग्जनेही त्याच्यासाठी बोली लावली नाही. आता चेन्नई संघाने ट्विटरवर रैनाचे इतक्या वर्षांच्या सेवेबद्दल आभार मानले. पिवळ्या जर्सीतील अनेक आठवणींसाठी सुपर थँक्स चिन्ना थाला, असे सीएसकेने म्हटले आहे.

## युवा विश्वविजेते ओस्तवाल, तांबे महाराष्ट्राच्या रणजी संघात

**मुंबई : प्रतिनिधी**

डावखुरा फिरकी गोलंदाज विकी ओस्तवाल आणि अष्टपैलू कौशल तांबे या भारताच्या युवा विश्वचषक विजेत्या संघातील दोन खेळाडूंना महाराष्ट्राच्या रणजी संघात स्थान देण्यात आले आहे.





ग-गटात समावेश असलेल्या महाराष्ट्राची १७ फेब्रुवारीपासून हरयाणाशी पहिली लढत सुरू होणार आहे. अंकित बावणेच्या नेतृत्वाखालील या संघात आघाडीचा फलंदाज राहुल त्रिपाठीकडे उपकर्णधार सोपवण्यात आले आहे. ऋतुराज गायकवाडची वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी निवड झाल्याने तो रणजीच्या साखळी टप्प्यासाठी उपलब्ध होऊ शकणार नाही, असे महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने म्हटले आहे.

संघ : अंकित बावणे (कर्णधार), राहुल त्रिपाठी (उपकर्णधार), यश नहार, पवन शहा, नौशाद शेख, अझीम काझी, विशांत मोरे (यष्टीरक्षक), सत्यजीत बच्छाव, अवधूत दांडेकर (यष्टीरक्षक), तरनजितसिंह ढिल्लाँ, मुकेश चौधरी, आशय पालकर, प्रदीप दधे, दिव्यांग हिंगणेकर, यश क्षीरसागर, विशाल गिते, निकित धुमाळ, सिद्धेश वीर, मनोज इंगळे, विकी ओस्तवाल आणि कौशल तांबे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. लाईफ इन्शुरन्स ऑफ कार्पोरेशन (एलआयसी) चे मुख्यालय या शहरात आहे.**
***अ.)*** दिल्ली ***ब.)*** कलकत्ता ***क.)*** मुंबई ***ड.)*** चेन्नई

**२. अदानी उद्योग समूहातील कोणत्या कंपनीची अलीकडे शेअर बाजारात नोंद झाली?**
***अ.)*** अदानी इंटरप्रायझेस ***ब.)*** अदानी विल्मर ***क.)*** अदानी ग्रीन एनर्जी ***ड.)*** अदानी पॉवर

**३. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**
***अ.)*** टाटा एलक्सी ***ब.)*** हॅपीइस्ट माइंड ***क.)*** झेन्सर टेक्नोलॉजीस ***ड.)*** बीएएसएफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

***...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!***




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com